बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक१२९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला

## ३९ मंत्र्यांनी घेतली मंत्रीपदाची शपथ
## भाजप १९, शिवसेना ११, राष्ट्रवादी ९
## विरोधी बाकावर नेमकं कोण असणार?
## ...आता खाते वाटपाकडे लागले लक्ष

नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत भरभक्कम बहुमत मिळाल्यानंतर तब्बल २२ दिवसांनी देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. या मंत्रिमंडळ विस्तारात धक्कातंत्राचा अवलंबन झाले. अनेक जुन्या चेहऱ्यांना आणि ज्येष्ठांना घरी बसवण्यात आले आहे. तसेच नवीन चेहऱ्यांना संधी दिली गेली आहे. नागपूर येथे रविवार(ता.१५) रोजी ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली. त्यामुळे फडणवीस मंत्रिमंडळाची संख्या आता ४२ वर गेली आहे. मंत्रिमंडळात जास्तीत जास्त ४३ जण असू शकतात.



### आता खातेवाटपाची प्रतिक्षा

महायुती सरकारमधील ३९ आमदारांचा शपथविधी सोहळा नागपूरमधील राजभवनात पार पडला आहे. शिंदे शिवसेना, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि भाजपच्या एकूण ३९ आमदारांनी शपथ घेतली आहे. त्यापैकी ३३ आमदारांनी कॅबिनेट तर ६ जणांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. त्यानंतर आता साऱ्यांचं लक्ष हे खातेवाटपाकडे असणार आहे.



महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं बहुमत मिळालं, तर महाविकास आघाडीला अपयश आलं. महायुतीला मिळालेल्या यशानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यानंतर आज (१५ डिसेंबर रोजी) महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला. मात्र, विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीतील पक्षाला विरोधी पक्षनेतेपदसाठी आवश्यक असणाऱ्या जागा देखील मिळाल्या नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपद मिळणार की नाही? याबाबत आता चर्चा सुरु आहेत.आता यासंदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विरोधी पक्षनेतेपदाबाबत सरकारची भूमिका काय? असा प्रश्न पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेतेपदाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करत सूचक विधान केलं. 'विरोधी पक्षनेतेपदाबाबतचा निर्णय हा विधानसभेच्या अध्यक्षांनी घ्यायचा असतो', असं त्यांनी म्हटलं. त्यामुळे आता विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर हे याबाबत काय निर्णय घेणार? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

### भाजपच्या मंत्र्यांची यादी!

चंद्रकांत पाटील, मंगलप्रभात लोढा, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, अतुल सावे, संजय सावकारे, अशोक उईके, आकाश फुंडकर, जयकुमार गोरे, शिवेंद्रराजे भोसले, नितेश राणे, जयकुमार रावल, माधुरी मिसाळ, मेघना बोर्डीकर, पंकज भोयर यांचा समावेश आहे.

### राष्ट्रवादी (अजित पवार) गट

हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, माणिकराव कोकाटे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव, इंद्रनील नाईक, माणिकराव कोकाटे यांचा समावेश आहे.

### शिवसेना मंत्र्यांची यादी!

गुलाबराव पाटील, दादा भूसे, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई, संजय शिरसाट, प्रताप सरनराईक, भरत गोगावले, प्रकाश आबिटकर, आशिष जैस्वाल, योगेश कदम यांचा मंत्रीमंडळात समावेश करण्यात आला आहे.

### कॉन्ट्रीब्युशन नसलेल्या लोकांना मंत्रीपद

आज मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये महायुतीच्या ३९ मंत्र्यांनी शपथ घेतली, यामध्ये ३३ कॅबिनेट मंत्र्यांचा तर ६ राज्य मंत्र्यांचा समावेश आहे. भाजपच्या १९ मंत्र्यांनी आज शपथ घेतली, तर शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या ९ मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या अनेक आमदारांना या मंत्रिमंडळ विस्तारात मंत्रिपदाची संधी मिळू शकलेली नाहीये. मंत्रिपद हुकल्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे. याचा पहिला धक्का हा शिवसेना शिंदे गटाला बसला आहे.पवनी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर हे मंत्रिपदासाठी इच्छूक होते. मात्र त्यांचं मंत्रिपद हुकल्यामुळे त्यांनी नाराजी व्यक्त करत शिववसेना उपनेतेपदाचा राजीनामा दिला आहे. आजच्या मंत्रिमंडळात आपण पाहिलं तर अशा लोकांना मंत्रिपद मिळाले ज्यांचं पक्षात काहीच कॉन्ट्रीब्युशन नाही, असं देखील त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

# धनंजय चंद्रचूड यांच्यावर खटला दाखल व्हायला हवा
## ठाकरे गटाचे गंभीर आरोप; मोदींवरही टीका

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासानिमित्त दोन्ही सभागृहांमध्ये संविधानावर चर्चा करण्यात आली. यादरम्यान सत्ताधारी आणि विरोधक यांनी एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप कले. या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील काल (१४ डिसेंबर) सहभाग घेतला. मोदींनी त्यांच्या भाषणात काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळालं. दरम्यान संविधानावर देशातील राजकीय वर्तुळात सुरू असताना शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका केली आहे. आमदार फोडणे तसेच विद्यमान मुख्यमंत्र्यांना तुरूंगात टाकणे हे कोणत्या संविधानात बसते? असा सवाल त्यांनी विचारला आहे. याबरोबरच राऊतांनी आमदार अपात्रता प्रकरणी माजी सरन्यायाधीश



धनंजय चंद्रचूड यांच्यावरही गंभीर आरोप केले.संजय राऊत म्हणाले की, विरोधी पक्षाला संसदीय लोकशाहीत महत्त्वाचं स्थान आहे, पण विरोधी पक्ष राहू नये यासाठी तपास यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावणे, विद्यमान मुख्यमंत्र्यांना तुरूंगात टाकणं हे कोणत्या संविधानात लिहिलं आहे?पुढे बोलताना राऊत म्हणाले की, ईडी, सीबीआय कधी भाजपा नेत्याच्या घरी गेलीय हे दाखवावं. उलट आमच्याकडे असताना ज्यांच्या घरी गेली होती ते आज मोदींच्या मांडीवर बसले आहेत आणि मोदी त्यांना दूध पाजत आहेत. आईच्या ममतेने मोदी त्यांची काळजी घेत आहेत. ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा ज्यांच्यावर मोदींनी आरोप केला, त्यांना तुमच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री पदाची शपथ दिली जाते, हे कोणत्या संविधानात लिहीले आहे? हे सांगा.आमदार आपात्रता प्रकरणी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी मोदींच्या दबावाखाली निर्णय घेतला नाही असा आरोपही राऊतांनी केला आहे. ते म्हणाले की ज्या पद्धतीने राज्यातील

पान २ वर...



**नागपूर:** येथे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत मंत्रीपदाची शपथ घेतांना, धनंजय मुंडे, पंकजा मुंडे

# तबला वादक झाकीर हुसैन यांचं निधन
## 'वाह उस्ताद वाह' म्हणत तबल्यावर लिलया पडणारी थाप शांत!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सुप्रसिद्ध तबला वादक झाकीर हुसैन ( नरझ्ळी र्वीरळप ) यांचं निधन झालं आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या मागे त्यांची पत्नी आणि दोन मुली असं कुटुंब आहे. झाकीर हुसैन यांना सॅनफ्रॅन्सिस्को येथील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांच्यावर उपचार सुरु होते, तसंच त्यांची प्रकृती गंभीर आहे असंही कळत



होतं. मात्र उपचारांदरम्यान झाकीर हुसैन यांची प्राणज्योत मालवली. गेल्या अनेक वर्षांपासून झाकीर हुसैन यांचं वास्तव्य अमेरिकेतच होतं. झाकीर हुसैन आणि तबला हे समीकरण म्हणजे दिवा आणि ज्योत कशी असते अगदी तसंच होतं. वडील अल्लाह राखा खान यांच्याकडूनच त्यांनी तबलावादनाचे धडे गिरवले होते. मात्र याच अत्यंत विनम्र कलावंताचं निधन झालं आहे. इंडियन एक्स्प्रेसने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

पान २ वर...

# आज बीड बंदची हाक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोमनाथ सूर्यवंशी ह्या भिम सैनिकाच्या मृत्यूच्या निषेधार्थ संबंध महाराष्ट्र बंद ची हाक आहे. याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातही आज दि. १६ वार सोमवार रोजी बौद्ध बांधवांच्या वतिने बंद पुकारण्यात आला आहे .

परभणी येथे संविधान विटंबना निषेधार्थ उसळलेल्या अंदोलनाने निर्माण झालेल्या संतप्त परिस्थिती पोलीस प्रशासनाने बौद्ध वस्त्यात कॉम्बिंग ऑपरेशन



करत भिम सैनिकांना तडकाफडकी अटक केली आहे . यात वडार समाजाचे असणारे

पान २ वर...

**दु:खद** | प्रकाश आंबेडकरांनी व्यक्त केला संताप

# न्यायालयीन कोठडीत तरुणाचा मृत्यू



परभणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी येथील स्टेशन रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर असलेल्या संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्याचा प्रकार समोर आला होता. याच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या बंदला हिंसक वळण लागले. शहरातील काही दुकाने आणि वाहनांवर दगडफेकीच्या घटना घडल्या. संतप्त जमावाने एसटी बसवरही दगडफेक केली होती. दरम्यान आता या दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या एका तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी याबद्दल सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे.मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सोमनाथ सुर्यवंशी असून प्रकाश आंबेडकरांनी त्याच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत की, परभणीत वडार समाजातील भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांचा कोठडीत मृत्यू झाला आहे, हे अत्यंत वेदनादायक, भयानक आणि असह्य करणारे आहे. त्यांचा जामीन अर्ज मंजूर होऊनही न्यायालयीन कोठडीतच त्यांचा मृत्यू झाला, याहून असहनीय काय असेल!पुढे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं की, त्यांचा (सोमनाथ सुर्यवंशी) मृत्यू न्यायालयीन कोठडीत झाला असल्याने, आमचे वकील न्यायालयाला विनंती करतील की पोस्टमॉर्टम (सीटी स्कॅन, एमआरआय, फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजिकल) फॉरेन्सिक विभाग असलेल्या सरकारी रुग्णालयामध्ये केले जावे आणि फॉरेन्सिक आणि पॅथॉलॉजी या दोन्ही विभागांकडून पोस्टमॉर्टमचे चित्रीकरण केले जावे. याबरोबरच प्रकाश आंबेडकर यांनी आम्ही न्यायासाठी लढू!, असेही म्हटले आहे.वंचित बहुजन आघाडीने सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर काल एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या पोस्टमधून परभणी पोलीसांनी दलित महिलेला मारहाण केल्याचा आरोप करण्यात

पान २ वर...

# ...तरीही मंत्रिमंडळात न्याय मिळाला नाही
## पत्रकार परिषद: मंत्री रामदास आठवलेंनी व्यक्त केली नाराजी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला एकही जागा दिली नाही तरी रिपब्लिक. कार्यकर्त्यांनी राज्यभर प्रामाणिकपणे भाजप महायुती ला साथ दिली. मात्र तरीही रिपब्लिकन पक्षाला न्याय मिळाला नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेकदा भेटून आश्वासन दीले तरीही मंत्रिमंडळात रिपब्लिकन पक्षाला स्थान दीले नाही.त्यामुळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे असे सांगत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय



सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार मध्ये रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्याला संधी दिली नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर आमचा विश्वास होता.अजून विश्वास आहे.त्यांनी उरलेल्या दोन मंत्री पदांमध्ये एक मंत्रिपद रिपब्लिकन पक्षाला द्यावे.त्यांनी अनेकदा रिपब्लीकन पक्षाला राज्यात मंत्री पद देण्याचे आश्वासन दिले

पान २ वर...

## महापुरुषांची विटंबना ही एक विकृती!

परभणीत पूर्णा ताडकळस येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीचा अपमान करण्यात आला. यानंतर परभणी जिल्ह्यात घटनेच्या निषेधार्थ कडकडीत बंद पाळण्यात आला. बंद दरम्यान आंबेडकरी अनुयायांनी रस्ता रोको करत काही भागांत दगडफेक केली. तसेच टायर जाळले. यावेळी पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर होते. संतप्त वातावरण पाहता परभणीमधील इंटरनेटची सुविधा खंडित करण्यात आली. त्या ठिकाणी जमावबंदी जाहीर करण्यात आली. हिंसक घटनांमुळे अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. मुळात राष्ट्रपुरुषांची स्मारके, प्रतिमा, त्यांच्या संदर्भातील वास्तू यांचे प्राणपणाने जतन करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. आजच्या काळात राष्ट्रपुरुषांच्या कार्याची, विचारांची आपण कधीही बरोबरी करू शकत नाही, त्यांच्याइतकी वैचारिक उंची आपण गाठू शकत नाही, त्यांचे कार्य लौकिकअर्थाने अलौकिक असेच असते. पण समाजातील विघातक अपप्रवृत्ती, नराधम मात्र कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्यासाठी, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण करण्यासाठी, समाज व्यवस्थेमध्ये वादंग पसरविण्यासाठी असे कृत्य करून असुरी आनंद मिळवत असतात, पण ही एकप्रकारची विकृती असते.

या विकृतांच्या असुरी आनंदाची प्रचलित समाजव्यवस्थेला फार मोठी किंमत मोजावी लागते, झालेली हानी भरून निघते, पण समाजामध्ये निर्माण झालेली तेढ, भावनिक जखमा भरून निघण्यास अनेक वर्षे निघून जातात. भारतीय समाज हा संवेदनशील व भावनाशील आहे. त्यातच भारतामध्ये विविधतेतून एकता हे पालूपद वारंवार आळविले जात असले तरी हे वाक्य सुभाषित म्हणून केवळ भिंतीवरच आजच्या काळात शोभून दिसते. विविध जातीधर्मियांचा भारतात समावेश असला तरी भारतीय समाज आजही जाती-धर्माच्या चौकटीतच अडकला आहे व त्या बंधनातच विखुरला गेला आहे. त्या जातीधर्माच्या चौकटी तोडून तो आजही देशाचा, देशाच्या अखंडतेचा विचार करत नाही, ही वास्तविकता असली तरी खऱ्या अर्थांने ती एक शोकांतिकाच आहे. राष्ट्रपुरुषदेखील आज आम्ही भारतीयांनी जातीधर्मात वाटून घेतले आहे. त्यामुळे राष्ट्रपुरुषदेखील जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त झाले आहेत.भारताची राज्यघटना ज्यांनी लिहिली, ते भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेदेखील मागासवर्गीय समाजाच्या एक-दोन जातीपुरतेच सीमित झाले असल्याचे वातावरण आज निर्माण झाले आहे. मुळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व जीवनपट पाहता प्रत्येक भारतीयांचे या विचारपर्वाचे देव्हाऱ्यांमध्ये देवाबरोबर पूजन केले पाहिजे, त्यांचे स्मरण केले पाहिजे. पण त्यांनाही जातीच्या वेष्टनाचा विळखा पडल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आजच्या समाजाला समजू शकले नाहीत. महात्मा जोतिबा फुले हे माळी समाजाचे, छत्रपती शिवाजी महाराज मराठा समाजाचे, लोकमान्य टिळक हे ब्राह्मण समाजाचे असे त्या त्या समाजाचे, जातीचे लेबल महापुरुषांना लावण्यात आले. मुळात महापुरुषांना जाती-धर्माच्या चौकटीमध्ये अडकवून ठेवण्याचा तुम्हा-आम्हाला कोणी अधिकार दिला? महापुरुषांच्या स्मारकांची विटंबना, त्यांच्याशी संबंधित साहित्याची अथवा वास्तूची विटंबना ही नक्कीच संवेदनशील व अक्षम्य बाब आहे. अशी निंदनीय घटना करणारा विकृत कोणत्याही जातीचा-समाजाचा असो, त्याला कदापी माफी मिळू नये. अशा घटना घडवून आणण्यामागे कोणाचे तरी षडयंत्र असते. समाजात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण व्हावा, जातीय दंगली व्हाव्यात, जाती-जातींमध्ये वाद निर्माण व्हावेत, हा हेतू अशा घटना घडवून आणण्यामागे त्या अपप्रवृत्तींचा असतो. त्यांच्या याच कुटिल खेळीला आपण बळी पडतो, हे आजवर विविध घटनांमध्ये दिसून आले आहे आणि यातूनच त्या विकृत नराधमांचा हेतू साध्य होतो.

मुळातच अशा घटना घडल्यानंतर सर्वप्रथम आम्ही भारतीयांनी थंड डोक्याने अशा घटनांचा आढावा घेऊन शोध घेतल्यास त्या नराधमांना धडा शिकविणे अवघड जाणार नाही. अहिंसा करून अशा घटनांची भरपाई होणे शक्य आहे का? याचाही आज थंड डोक्याने विचार करण्याची वेळ आली आहे. अशा घटना घडताच आपण संयम व सहनशीलता गमावून बसतो व त्यातूनच उद्रेक जन्माला येतो. जमावाला डोके नसते आणि रागाला विचार करता येत नाही. अशाच घटनांना यातून खतपाणी नकळत घातले जाते. राष्ट्रपुरुषांची स्मारके पुन्हा उभारली जातील, पण समाजव्यवस्थेचे रागाच्या भरात झालेले नुकसान पुन्हा भरून येणे शक्य नाही. राष्ट्रपुरुषांच्या कार्याचे व विचारांचे संवर्धन झाल्यास आपला समाज नजीकच्या काळात नक्कीच सुजलाम सुफलाम होईल. मुळातच राष्ट्रपुरुषांचे कार्य, त्यांचा जीवनपट आजही अनेकांना माहिती नसतो. केवळ तो कोणीतरी मोठा माणूस आहे आणि आपल्या समाजाचा आहे व अशा घटनांतून आपल्या समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा विचार डोक्यात ठेऊन समाज रस्त्यावर उतरतो. मुळातच राष्ट्रपुरुषांना विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही करत आहोत.नराधम एकदा कृत्य करतो; परंतु राष्ट्रपुरुषांना, त्यांच्या कार्याला, जीवनपटाला विशिष्ट जातीधर्माच्या चौकटीत बंदिस्त करण्याचे पातक आम्ही वर्षानुवर्षे करत आहोत. आम्हीही तितकेच दोषी आहोत. मुळात परभणीत घडलेली घटना ही पहिलीच नाही. महाराष्ट्रात नव्हे तर देशातही अशा घटना अनेकदा घडल्या आहेत. ११ जुलै १९९७ रोजी मुंबईतील घाटकोपरमधील रमाबाई नगरामध्ये घटनाकारांच्या स्मारकाच्या झालेल्या विटंबनेची फार मोठी किंमत मुंबईला चुकवावी लागली आहे. अशा घटना घडणे निंदनीय आहे. अशा घटनांना पायबंद बसणे काळाची गरज आहे. घटना घडल्यावर उद्रेक न करता शांतपणे विचार करून संयम दाखविल्यास गुन्हेगारांना धडा शिकविणे सोप्पे जाते व समाजाचे नुकसानही टळते.

# अंतर्बाह्य वेध घेणारा लेखक: बालाजी सुतार

११ वे'अंबाजोगाई साहित्य संमेलन' रसिकांनी, रसिकांसाठी आयोजित केलेले एक अभिनव साहित्य संमेलन.कसल्याही राजकीय किंवा शासकीय मदतीविना, लोकवर्गणीतून हा साहित्य सोहळा संपन्न होत असतो. या अंबानगरीस... शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर, अर्थातच कौतुकाने मराठवाड्यातील पुणं असं उगीच नाही संबोधल्या जात ! साहित्य विश्व समृद्ध करणारी अंबानगरी ही या शहराची ओळख आहे.माझे पदवी पर्यंतचे शिक्षण अंबाजोगाई झाले. सांस्कृतिक-सामाजिक-शैक्षणिक-साहित्यिक चळवळीत मला सहभागी होता आलं आणि मी घडत गेलो,घडतो आहे. अंबाजोगाई साहीत्य संमेलनात मी कवी म्हणून तसेच एकपात्री प्रयोग कलावंत म्हणून सादरीकरण केले आहे. या निमित्ताने प्रकाशित झालेल्या स्मरणिकेत माझ्या कविताही छापून आलेल्या आहेत.

जागतिकीकरणामुळे जे आमूलाग्र बदल झाले त्या विविधांगी बदलांचा अंतर्बाह्य वेध आपल्या सकस लेखणीतून घेणाऱ्या साहित्यकाराची अर्थातच बालाजी सुतार यांची मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाई शाखेच्या वतीने आयोजित ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.हे विलक्षण आनंददायी आहे. खराखुरा लेखक संमेलनाध्यक्ष होतो आहे. हे ऐकून-वाचून लई भारी वाटतंय! अंबाजोगाईच्या साहित्य संमेलनाध्यक्ष निवडीच्या प्रथा आणि परंपरेनुसार पुर्वाध्यक्ष प्रख्यात कवी-गीतकार डॉ.दासू वैद्य यांनी बालाजी सुतार यांचं नाव बंद लिफाफ्यात अंबाजोगाईच्या मसाप कार्यकारिणीला कळवलं. थोर साहित्यिक प्रा. रंगनाथ तिवारी,शैला (भाभी) लोहिया, डॉ. संतोष मुळावकर, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, मंदाताई देशमुख,गणपत व्यास,डॉ. दासू वैद्य आदी दिग्गज साहित्यिकांनी या संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले आहे.

बालाजी सुतार यांना मिळालेला हा संमेलनाध्यक्ष पदाचा बहुमान ग्रामीण भागातील लिहित्या हातांचा नावलौकिक वाढवणारा आहे.या पूर्वीही महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा इस्लामपूर व राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर आयोजित २८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा सन्मानही साहित्यिक बालाजी सुतार यांना मिळलेला आहे .कोण किती मोठा कलाकार - साहित्यकार आहे यापेक्षा त्याचे योगदान समाजात कसे रुजले आहे. मनामनांचा थांग त्याने कसा घेतला आहे हे महत्वाचे.साहित्यिक-कलावंत हा कधीच लहान-मोठा नसतो. हा तो वेगळा असतो म्हणूनन त्यात स्थर नसतो असे मला वाटते.साहित्यिक बालाजी सुतार यांच्या सारखे संतुलित लेखन करणारा दुसरा साहित्यिक दुर्मिळच!आजच्या परिस्थितीतील अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांचा परामर्श त्यांनी आपल्या साहित्य लेखनात घेतला आहे.मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्नशील असलेले आश्वासक लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. एक संवेदनशील साहित्यिक असल्यामुळे देशातील प्रचलित वाढत्या असहिष्णुतेवर भाष्य करणारे लेखक म्हणून बालाजी सुतार सर्वपरिचित आहेत. झुंडशाहीसमोर शरण न जाता तिला फाट्यावर मारणारे सडेतोड लेखक म्हणून बालाजी सुतार वाचकांना अधिक जवळचे वाटतात. माणूसपणाची संकल्पना पूर्ण करणारा लेखक अशी ओळख असणारे व्यक्तिमत्त्व बालाजी सुतार यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' या कथासंग्रहाला बी. रघुनाथ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आजवर महाराष्ट्रातील अनेक महत्वाचे पुरस्कार प्रतिभावान लेखक बालाजी सुतार यांना प्राप्त झाले आहेत.यामध्ये नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण केंद्रामार्फत देण्यात येणारा सन २०२० चा 'बाबूराव बागूल कथा पुरस्कार' बालाजी सुतार यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरची नोंदी' या कथासंग्रहाला प्रदान करण्यात आला आहे.गडहिंग्लज येथील पूज्य साने गुरुजी सार्वजनिक ग्रंथालयातर्फे त्यांना साने गुरुजी साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

लेखक बालाजी सुतार आजच्या पिढीतले महत्त्वाचे लेखक आहेत. शब्द प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरची नोंदी' या पहिल्याच कथासंग्रहातून मराठी लघुकथेला एक नाव आयाम त्यांनी दिला आहे. आशययुक्त विलक्षण भाषाशैली, नव्या बदललेल्या जगाकडे पाहण्याची अनोखी दृष्टी, ग्रामीण भागातील बदलांचे सूक्ष्म निरीक्षण आणि कथावस्तूतील विषय वैविध्य हा लेखक आपल्या कथांमधून मांडतो. ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस या कथासंग्रहाबाबत म्हणतात, की लघुकथेच्या बंदिस्त परिघातून मराठी कथेला स्वतःचा मोकळा अवकाश प्राप्त करून देणाऱ्या

आजच्या कथाकारांत बालाजी सुतार यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.त्यांचा हा कथासंग्रह आजच्या मराठी कथेला नवा स्वर प्राप्त करून देणारा आहे. आधुनिकीकरणाच्या रेट्याने भारताचा ग्रामीण भाग ढवळून निघाला आहे. शेतीच्या समस्या दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहेत. कुटुंबे तुटत चालली आहेत. आणि तरीही गावांचा प्रवास सुरूच आहे.या प्रवासाचे अस्सल चित्रण म्हणजे बालाजी सुतार यांनी लिहिलेला 'गावकथा'हा दीर्घांक. एकूणच नाटकाच्या सर्वसाधारण व्याख्येला फाटा देणारे नाटक म्हणजे गाव कथा. इथे सरळ धोपट कथा अशी काही नसताना नाटक तुमचा ताबा घेते. वेगवेगळ्या प्रसंगांतून नाटक सुरू झाल्यावर काही काळ या मांडणीमधून कथेमध्ये प्रेक्षक म्हणून प्रवेश करायला वेळ लागतो. पण एकदा तुम्ही कथेमध्ये प्रवेश केला की मात्र तुम्ही तेथून बाहेर पडू शकत नाही. कथा लिहिताना लेखक बालाजी सुतार यांनी गावातील अनेक गोष्टी अतिशय



प्रा. डॉ.सिद्धार्थ तायडे
९८२२८३६६७५

वास्तव पद्धतीने मांडल्या आहेत. कविमनाचा शेतकरी आणि त्याचे सोयाबीन जळून जाते, भावकीचा वाद, कुणब्याची व्यथा, सावकारी फास,गावात एसटीमध्ये फुलणारी आणि तिथेच कोमजणारी प्रेम कहाणी, प्रत्येक प्रसंगात गाव व्यवस्थेतील व्यथा अगदी सहज आपल्यापर्यंत पोचल्याशिवाय राहत नाही. हे नाटक आपल्याला अस्वस्थ करते. प्रत्येक पात्राची स्वतंत्र आशी कथा आपल्या समोर येते. भोवताल सोडुन कोणी संत होत नाहीगावकथा म्हणते माझा अंत होत नाही याची विलक्षण प्रचिती म्हणजे बालाजी सुतारांची 'गावकथा' होय.एक संवेदनशील वाचक, लेखक, विचारवंत असलेल्या आमच्या सन्मित्राला साहित्य ११व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदाचा बहुमान मिळणे हा आनंद शब्दातीत तर आहेच पण त्या साहित्य संमेलनाची उंची देखील साहित्यिक बालाजी सुतार यांच्यामुळे वाढेल हे निश्चितच!

११ वे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या यशस्वितेसाठी गेली अनेक महिन्यांपासून अनेक हात झटत आहेत त्यामुळे हे संमेलन मागील १० संमेलना पेक्षा अधिक दर्जेदार, वैचारिक आणि लोकाभिमुख ठरेल यात शंका नाही. यावर्षीचे हे संमेलन दशक पुर्ती नंतरचे पाहीले संमेलन आहे. त्यामुळे या संमेलनात जाणीवपूर्वक नवीन प्रयोग, नवे बदल घडवून आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला आहे. ही सगळी तयारी आपल्या सहभाग आणि शुभेच्छा मुळेच करण्यात आली आहे, यात शंका नाही.१४ आणि १५ डिसेंबर रोजी हे संमेलन होणार आहे. १४ डिसेंबर रोजी दुपारी ३:०० निघणाऱ्या जागर दिंडीने या संमेलनाच्या उपक्रमांची सुरुवात होणार आहे. तर १५ डिसेंबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता समारोपाचे सत्र सुरू होणार आहे. १४ डिसेंबर रोजी ४ वाजता उद्घाटनीय कार्यक्रमानंतर लगेचच निमंत्रितांचे कवी संमेलन, त्यानंतर लगेचच खुले कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.१५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत सलग संमेलन अध्यक्ष बालाजी सुतार यांच्या साहित्यावरील परिसंवाद, नव्या शैक्षणिक धोरणात भाषा शिक्षण, कथाकथन अशा विविध परीसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर सायंकाळी ४:०० वाजता समारोप होणार आहे.

या सर्व कार्यक्रमांना आपल्या उपस्थिती सहभागाशिवाय कशी शोभा येणार! हे संमेलन यशस्वी करण्यासाठी आपण या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व उपक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

समकालीन भवतालाचा अंतर्बाह्य वेध घेणारे साहित्यिक आमचे सन्मित्र संमेलनाध्यक्ष बालाजी सुतार (बासुदा) यांचे आणि स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार तसेच अंबाजोगाई मसाप कार्यकारिणी अध्यक्ष दगडू (दादा) लोमटे, सचिव गोरख शेंद्रे, अमर हबीब ,डॉ. राहुल धाकडे,अभिजित जोंधळे, अमृत महाजन ,सर्व सदस्य, पदाधिकारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

## पान एक वरून

**धनंजय चंद्रचूड यांच्यावर**

सरकारमधील आमदार फोडले, १०व्या शेड्यूलनुसार सगळे अपात्र ठरले पाहिजेत. मात्र नरेंद्र मोदी यांच्या दबावाखाली सर्वोच्च न्यायालयाने, चंद्रचूड यांनी निर्णय दिला नाही. हे काय संविधानात बसतं का? चंद्रचूड यांच्यावरती खरंतर खटला दाखल केला पाहिजे.आमदार आपात्रता प्रकरणी माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी मोदींच्या दबावाखाली निर्णय घेतला नाही असा आरोपही राऊतांनी केला आहे. ते म्हणाले की ज्या पद्धतीने राज्यातील सरकारमधील आमदार फोडले, १०व्या शेड्यूलनुसार सगळे अपात्र ठरले पाहिजेत. मात्र नरेंद्र मोदी यांच्या दबावाखाली सर्वोच्च न्यायालयाने, चंद्रचूड यांनी निर्णय दिला नाही. हे काय संविधानात बसतं का? चंद्रचूड यांच्यावरती खरंतर खटला दाखल केला पाहिजे.ज्या पद्धतीने मोदी हे राज्य चालवत आहेत ते संविधानाच्या विरोधात आहे. संविधान हा देशाचा आधार आहे आणि तो आधार नरेंद्र मोदी यांनी उद्ध्वस्त केला आहे, असेही राऊत यावेळी म्हणाले.राऊतांनी मध्य प्रदेशमधील परमार दाम्पत्याच्या आत्महत्येचा मुद्दादेखील उपस्थित केला.मध्य प्रदेश मध्ये मनोज परमार आणि त्यांच्या पत्नीने आत्महत्या केली. त्यांच्या लहान मुलाने राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमध्ये सहभाग घेतला आणि त्याने जमवलेला गल्ला दान केला. तो राग ठेवून ईडीने त्यांच्यावर कारवाई केली. त्यांच्यावर भाजपामध्ये जाण्यासाठी दबाव टाकला, त्या आई-वडीलांनी आत्महत्या केली. हे मोदींच्या संविधानात आहे का? हे मोदींनी सांगावं. मोदी हे या देशाला लाभलेले गेल्या ६५ वर्षातील असत्य बोलणारे सगळ्यात महान पंतप्रधान आहेत, असे राऊत म्हणाले.अदाणी यांना जे विरोध करतात ते संविधान विरोधीअदाणींना विरोध करतात त्यांना संविधानविरोधी ठरवले जाते असा आरोप राऊतांनी केला. ते म्हणाले की, आमच्या संविधानाचा नारा आहे 'सत्य मेव जयते' पण गेल्या १० वर्षात फक्त असत्याचा विजय करण्याचं काम मोदी काळात झालं आहे. मोदींचा नवीन संविधानकर्ता कोणी असेल तर तो गौतम अदाणी हे आहेत. गौतम अदाणी यांना जे विरोध करतात ते संविधान विरोधी आहेत हे मोदींना सांगायचे आहे.

**तबला वादक झाकीर हुसैन**

झाकीर हुसैन हे सुप्रसिद्ध तबलावादक अल्लाह राखा खान यांचे पुत्र होते. झाकीर हुसैन यांनी अनेक भारतीय आणि परदेशी चित्रपटांना संगीत दिलं आहे. 'साझ' या सिनेमात त्यांनी अभिनयही केला आहे. झाकीर हुसैन यांनी वडील अल्लाह राखा खान यांच्यासह तबला वादनाचे धडे वयाच्या सातव्या वर्षापासून गिरवण्यास सुरुवात केली. तसंच वयाच्या १२ व्या वर्षापासून झाकीर हुसैन देशभरात त्यांनी तबला वादन परफॉर्म करण्यास सुरुवात केली होती.१९८८ मध्ये झाकीर हुसैन यांना पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण, २०२३ मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे. तसंच १९९० मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचा संगीत पुरस्कारही मिळाला होता. २००९ मध्ये झाकीर हुसैन ५१ व्या ग्रॅमी पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. उल्लेखनीय बाब ही आहे की झाकीर हुसैन यांना त्यांच्या कारकिर्दीत ७ वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालं होतं त्यापैकी चारवेळा त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. तबला नसांनसांमध्ये भिनलेला आणि रसिकांच्या हृदयात भिनवणारा कलावंत आज काळाच्या पडद्याआड गेला आहे.

**आज बीड बंदची**

भिम सैनिक सोमनाथ सुर्यवंशी यांना देखील अटक झालेली होती . सुर्यवंशी यांचा पोलीस कोठडीतच मृत्यू झाला आहे. या घटनेला संबंधित पोलीस अधिकारी जबाबदार आहेत. ह्या घटनेने आम्हा व संबंध राज्य/देशभर आंबेडकरी , बौध्द बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. हा नुसता मृत्यू नसुन हा खून आहे . संबंधित पोलीस ह्यास जबाबदार आहेत. सदरील घटनेत जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी अशी आमची मागणी आहे .निवेदनात म्हटले आहे कि ,परभणी येथील संविधान विटंबना प्रकरणी निषेधार्थ झालेल्या अंदोलनातील गुन्हे मागे घेण्यात यावेत,अटकेतील सर्व अंदोलकांची सुटका करावी ,अमानूष मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कार्यवाही करण्यात यावी ,शहिद भिम सैनिक सोमनाथ सूर्यवंशी सोमनाथ व्यकंट यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात यावे .आशा मागण्या लावून धरण्यात येत आहेत.

**न्यायालयीन कोठडीत**

आला आहे.व्हिडीओमध्ये रुग्णालयात दाखल दलित महिलेला परभणी पोलिसांनी बेदम मारहाण केली. पोलीसांनी तिच्या मांड्या आणि पोटावर उभे राहून तिच्या डोक्यावर व हातावर लाठ्या मारल्या. तिला शौचालय वापरायचे आहे असे तिने म्हटल्यावर पोलीसांनी तिचे पाय पसरले आणि तिच्या पायांवर मारले.तिचा एक हात फ्रॅक्चर झाला असून, तिच्या डोक्याला झालेल्या जखमांसाठी तिला सीटी स्कॅन करावे लागेल, असे सांगण्यात आले. हे एकमेव प्रकरण नाही! परभणीत आंबेडकरी वस्त्या लक्षित पोलिस अत्याचाराची अशी शेकडो प्रकरणे समोर आली आहेत! शेकडो!! हे लिहितांना आपले डोळे राग आणि अश्रूंनी भरून आले आहेत, असेही पोस्टमध्ये वंचित आघाडीने म्हटले आहे.

**...तरीही मंत्रिमंडळात न्याय**

होते मात्र त्यांनी शब्द पाळला नाही.रिपब्लिक. पक्षाचा विचार केला नाही.आम्ही गृहमंत्री अमीत शहा आणि भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांना भेटून महायुती सरकार मध्ये रिपब्लिकन पक्षाला एक मंत्री पद देण्याची मागणी केली होती.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आश्वासन.दिले होते मात्र पाळले नाही त्यामुळे रिपब्लिकन पक्षात नाराजी असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले. लोकसभेत जे मतदान मिळाले नाही ते मतदान विधानसभेत भाजपा महायुतीला मिळाले. सर्व समज घटकांचे मतदान मिळाले त्यासोबत दलित बौद्ध आंबेडकरी जनतेचे मतदान मोठ्या प्रमाणात महायुतीला मिळाले. त्यामुळे महायुतीचा महविजय झाला आहे .रिपब्लिकन पक्ष छोटा पक्ष आहे पण प्रामाणिक पक्ष आहे एका जील्ह्यापूरता मर्यादित पक्ष नाही तर राज्यभर महत्वाचा पक्ष आहे. विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एक ही जागा दिली नाही तरी रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सर्व मतदार संघात भाजप महायुतीला साथ दिली.मात्र मंत्रिमंडळात रिपब्लिकन पक्षाला एक मंत्री पद देण्याचा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाळला नाही अशी नाराजी ना.रामदास आठवले यांनी आज बांद्रा येथे पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

## विनोद गर्जे यांनी मिळविला आयर्नमॅन-२०२४ चा बहुमान

पाटोदा/प्रतिनिधी

एक सैनिककच शारीरिक,मानसिक क्षमतेवर मात करून यशस्वी होऊ शकतो याची प्रचिती विनोद याने पुन्हा सिध्द केली असुन देश विदेशी खेळाडूतुन शरिराची कस ना कस लावुन विनोद आयर्नमॅन म्हणून विजेता ठरला असुन हे पाटोदा तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे.पाटोद्याचं भूमिपुत्र राहुल आवारे व इतर खेळाडूंनंतर विनोदने खडतर खेळात पुन्हा पाटोद्याचं नाव कोरलं आहे. हे प्रत्येक पाटोदा वासियांना गर्व वाटावा असाच बहुमान आहे.कर्नल कल्याण डोरले यांचे प्रतिपादन ते विनोद गर्जे यांच्या सन्मान सोहळा निमित्त बोलत होते.

शारीरिक आणि मानसिक क्षमतांची परीक्षा घेण्यासाठी प्रसिद्ध असलेली विदेशातील स्पर्धा डेक्कन स्पोर्टस कल्ब पुणे यांच्या वतीने 'आयर्नमॅन-२०२४' ही खडतर स्पर्धा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली होती त्यांमध्ये पाटोदा तालुक्याचे भुमिपुत्र व इंडियन पोस्ट पाटोदा शाखेचे व्यवस्थापक श्री.विनोद पोपट गर्जे यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली.जगभरातून सहाशे ते सातशे स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.विनोद गर्जे यांनी निर्धारित वेळेपेक्षा कमी कालावधीत स्पर्धा पूर्ण करून पाटोदा तालुक्याची मान उंचावली.

अतिशय खडतर व अवघड असलेली ही स्पर्धा अवघ्या ८ तासांमध्ये पूर्ण करावी लागते. यामध्ये प्रथम दोन किलोमीटर स्विमिंग,९० किलोमीटर सायकलिंग आणि २१ किलोमीटर रनिंग (धावणे) या तीन स्पर्धांचा समावेश असतो.विनोद यांनी ७ तास १२ मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली. रविवारी (दि.८ ) पहाटे ६ वाजता ही स्पर्धा सुरू झाली, ती दुपारी २ वाजता संपली. वयाच्या ३८ व्या वर्षी विनोद यांनी निर्धारीत वेळेपेक्षा कमी वेळेत बाजी मारली. बीड जिल्ह्यासह पाटोद्यासाठी ही अभिमानास्पद बाब असून, सर्वच स्तरांतून विनोद गर्जे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.याच अनुषंगाने कर्नल कल्याण डोरले यांनी बुधवार दि.११ रोजी विनोद गर्जे यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीमंत काकडे साहेब, राजाभाऊ सानप साहेब,मच्छिंद्र भालेकर, प्रसाद मोराळे व बेद्रे आण्णा. आदी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## पान सहा वरून

**गुंडगिरीच्या विरोधात एकत्र**

देशमुख कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही असेही पाटील म्हणाल्या. खासदार रजनी पाटील यांनी तेथूनच बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क साधला आणि या प्रकरणातील सद्यस्थितीची माहिती घेतल्यानंतर त्यांनी यातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा नाहीतर जन आक्रोश थांबणार नाही असे निर्देश पोलीस अधीक्षकांना दिले. देशमुख कुटुंबाची भेट घेताना खासदार रजनी पाटील यांना अश्रू अनावर झाले होते. यावेळी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, काँग्रेस चे जेष्ठ नेते नवनाथ थोटे, हनुमंत मोरे, केज तालुका काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रवीण कुमार शेप, महिला काँग्रेस च्या जिल्हाध्यक्ष मिनाक्षी पांडुळे यांची उपस्थिती होती.

**बीड-परळीत दहशतीचं**

करायचंय ? अशा प्रकारची भूमिका साकारतांना दिसत आहेत असे जनतेने समजावे का? मात्र आयपीएस अधिकारी असून सुद्धा त्यांच्याकडे क्शन पावर असून सुद्धा कोणत्याही प्रकारचे क्शन न घेता गुन्हेगारीला ते सुद्धा खत पाणी घालत आहेत असेही जनतेने समजावे का ? असाही सवाल जिल्हयातील जनता या माध्यमातून पोलीस अधिक्षक यांना करत आहे. परळी-बीड मध्ये अशा प्रकारचे दहशतीचं वातावरण व अतिसंवेदनशिल परिस्थितीचं वातावरण आहे हे सबंध बीड जिल्याहतील लोकप्रतिनिधींचं अपयश आहे अशी सोशल मीडियावर संतापजनक पोस्ट ड. शंकर चव्हाण यांनी केली आहे. खंडण्या व कार्यकर्त्यांचे गुंडाराज, व्यापाऱ्यांवर दबाव यामुळे बीड जिल्ह्याचा बिहार झालाय की काय असाही तीव्र संताप सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केला आहे. गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना आळा घालण्यापेक्षा बीड जिल्ह्याला बदनाम करू नका अशा प्रकारच्या प्रतिक्रिया लोकप्रतिनिधींच्या मीडियाच्या माध्यमातून पहावयास मिळत आहेत. मात्र अशा प्रकारच्या प्रतिक्रिया देण्यापेक्षा त्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पोलीस प्रशासनामार्फत कडक कारवाई व्हावी यासाठी प्रयत्न केले तर येणाऱ्या काळामध्ये गुन्हेगारीला किमान आला तर बसेल अशी लोकभावना आहे.

**गेवराईत विविध कार्यक्रमाचे...**कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत तर सर्व कार्यक्रमास मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार, सौ गिताभाभी बाळराजे पवार ,शिवराज पवार उपस्थित राहणार आहेत तरी मतदारसंघातील सर्वानी आरोग्य शिबीरात सहभाग घ्यावेत असे संयोजन समितीच्या वतिने आव्हान करण्यात आले होते.

**वाल्मीक कराडांच्या समर्थनार्थ...** सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेत केज तालुक्यातील मस्साजोग येतील सरपंच संतोष देशमुख यांच्या खर्या मारेकर्यांचा शोध घ्यावा अशा भावना आंदोलकांनी व्यक्त केल्या.दिंद्रुड पोलीस स्टेशनचे ठाणेदार अण्णाराव खोडेवाड यांच्या मध्यस्थीने हे आंदोलन मागे घेण्यात आले.माऊली खाडे, भगवान कांदे, बळीराम डापकर, उत्तम कांदे, गोविंद कांदे, हनुमंत केकान , धर्मराज सांगळे, गोपाळ कांदे, पद्माकर मुंडे, बाबासाहेब बडे, गोरख सांगळे, सोमनाथ गोरे, विकास बडे, संदीप तिडके, विकास केकान यांच्यासह संगम-चाटगांव पंचक्रोशीतील ओबीसी समाज या प्रसंगी उपस्थित होता.

**परभणी पोलिसांच्या कस्टडीत**

पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. शहरातील रोडे चौकात सोमनाथ सूर्यवंशी यास भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ गायकवाड, उत्तम माने, आर. एच. अण्णा व्हावळे, महेंद्रजी रोडे, सुनील अण्णा कांबळे, सुरेश रोडे, सुशील सरवदे,रमेश पवार, राहुल घोबाळे, डॉ. माणिकराव कांबळे, राहुल पैठने, बिंदुसार रोडे, धम्मदीप गोडबोले, अजय कांबळे, रामजी गायकवाड, धम्मा रोडे, नाना सरवदे, आदी समाज बांधव उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**


हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## ठाण्यात काही भागांत १५ टक्के पाणीकपात

**ठाणे :** पिसे विद्युत उपकेंद्रातील मुख्य ट्रान्सफॉर्मर क्र.१ च्या 'बी' फेज करंट ट्रान्सफॉर्मरमध्ये अचानक बिघाड झाल्यामुळे उदंचन केंद्र पिसे येथील एकूण कार्यरत २० पंपांपैकी ६ पंप बंद झाले. त्यांच्या दुरुस्तीचे काम रविवार (१५ डिसेंबर) हाती घेण्याचे ठरविले होते. या तातडीच्या दुरुस्ती कामामुळे दिनांक रविवारी या बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे ठाणे महानगरपालिकेस होणाऱ्या पाणीपुरवठ्यात १५ टक्के कपात करण्यात येणार आहे. यामुळे आज ठामपा क्षेत्रातील नौपाडा, पाचपाखाडी, बी - केबीन, महागीरी, कोपरी, आनंदनगर, गांधीनगर, हाजुरी, किसननगर, लुईसवाडी, अंबिका नगर या भागातील पाणीपुरवठा कमी होईल. तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी खबरदारीचा उपाय म्हणून या कालावधीत पाणी काटकसरीने वापर करावा असे महानगरपालिका प्रशासना तर्फे सांगण्यात आले आहे.



## वेचक

### 'ठाणे हाफ मॅरेथॉन' आज आयोजन

**ठाणे :** रिअल इस्टेट कंपनी रुनवाल रिअल्टी आणि प्ले फ्री स्पोर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने आज (१५ डिसेंबर) ठाणे हाफ मॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. ठाणे पश्चिम, मानपाडा येथील रुनवाल २५ आवर्स लाइफपासून सुरुवात होणारी ही मॅरेथॉन केवळ आरोग्याचा उत्सव नसून, एका महत्त्वपूर्ण उद्देशासाठी आहे. या उपक्रमातून मिळणारा निधी भारतातील पॅरा-ॲथलेटिक चॅम्पियन्ससाठी वापरला जाईल, त्यांना कृत्रिम पाय देऊन त्यांच्या स्वप्नांना पंख दिले जाणार आहे. "ब्रेकिंग बॅरियर्स, बिल्डिंग चॅम्पियन्स" या थीमखाली सर्व स्तरांतील धावपटूंना सहभागी होण्याचे आमंत्रण दिले असून २१ किमी, १० किमी, ५ किमी आणि १ माईल अशा चार शर्यतींचा पर्याय आहे. तसेच सर्व सहभागींसाठी ड्राय फिट टी-शर्ट्स, फिनिशर मेडल्स, रुचकर नाश्ता आणि रु १,००० पेक्षा अधिक किमतीची व्हाउचर्स यासारख्या खास भेटवस्तूंची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना ट्रॉफी, विशेष गिफ्ट्स आणि आणखी व्हाउचर्स दिल्या जाणार आहे.

### 'जलजीवन मिशन' अंमलबजावणीसाठी प्रशिक्षण

**ठाणे :** जलजीवन मिशन कार्यक्रमाचे गावपातळीवर प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायत स्तरावरील पाणीपुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन विषयक गाव पातळीवरील भागधारकांचे प्रशिक्षण (दि.१६ डिसेंबर ते ९ जानेवारी २०२५) या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. हिमालय इन्स्टिट्युट फॉर इन्व्हार्यनमेंट इकोलॉजी ॲण्ड डेव्हलपमेंट, संस्था डेहराडून, उत्तराखंड यांच्यामार्फत १ हजार ९७० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्रशिक्षण तांत्रिकदृष्ट्या उत्तम नियोजन करणे आवश्यक असल्याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन केले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील पाणीपुरवठा योजनेचे संचालन, देखभाल व दुरूस्ती आणि सुयोग्य व्यवस्थापन यासाठी भागधारकांचा सहभाग, तसेच गावपातळीवर पाणी विषयक समस्या वेळेत सोडवण्याच्या उद्देशाने जल जीवन मिशन विभागामार्फत प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे या प्रशिक्षणासाठी मुरबाड - ४४५ प्रशिक्षणार्थी, शहापुर -५५० प्रशिक्षणार्थी, भिवंडी - ६०५ प्रशिक्षणार्थी, कल्याण -२३० प्रशिक्षणार्थी, अंबरनाथ - १४० प्रशिक्षणार्थी असे जिल्ह्यातील एकूण १ हजार ९७० प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण होणार असल्याबाबतची माहिती प्रकल्प संचालक प्रमोद काळे यांनी दिली आहे.

### तरुणाचा निष्काळजीपणा जीवावर बेतला

**कल्याण :** कधी-कधी थोड्याशा निष्काळजीपणामुळे जीव जाऊ शकतो, अशीच एक घटना कल्याणच्या पश्चिम भागात घडली आहे.



एका तरुणाला कुत्रा आणि मांजराने चावा घेतला होता; परंतु वेळीच ठोस उपचार न घेतल्यामुळे मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोरी आली आहे. २ महिन्यांपूर्वी तरुणाला भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. काही दिवसांनंतर एका मांजरीने देखील तरुणाला चावले होते. या दोन्ही घटनेबाबत त्या तरूणाने अत्यंत निष्काळजीपणा दाखवला आणि दोन दिवसांपूर्वी त्याची प्रकृती अचानक बिघडली दरम्यान त्या तरुणाचा मृत्यू झाला.

### रुग्णवाहिका मिळण्यास करावी लागली प्रतीक्षा

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली मनपाच्या रुग्णालयातील गलथान कारभारचा फटका बसल्याचा प्रकार समोर आला आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या टिटवाळा येथील रुक्मीणी प्लाझा या प्रसूती गृहात एका महिलेची प्रसूती झाल्यावर तिची प्रकृती गंभीर असल्याने तिला पुढील उपचारासाठी मुंबईला हलविण्याकरीता रुग्णवाहिका हवी होती. रुग्णवाहिका तीन तासांच्या प्रतिक्षेनंतर उपलब्ध झाली. याप्रकरणी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याने तीव्र संताप व्यक्त करीत आंदोलन करण्याचा इशारा दिला. दरम्यान "या संदर्भात उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले की, मनपाकडून रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यास विलंब झाला. मात्र महिलेला मुंबईतील रुग्णालयात पाठविले आहे. त्याचबरोबर अन्य एका महिलेची प्रसूती देखील करण्यात आली आहे. महापालिकेकडे सध्या १४ रुग्णवाहिका आहे. त्यापैकी एक रुग्णवाहिका नादुरुस्त आहे. आणखीन ९ रुग्णवाहिका खरेदी करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. लवकर ९ रुग्णवाहिका दाखल होती. त्यामुळे रुग्णवाहिकांची एकूण संख्या २३ इतकी होईल असे सांगितले."

### प्लास्टिक वापर बंद करण्याकरिता जनजागृती

**मुरबाड :** प्लास्टिक पर्यावरणास खूप हानिकारक आहे तसेच प्लास्टिक विघटन होण्यास खूप वेळ लागतो. म्हणून मुरबाड नगरपंचायत एकल प्लास्टिक वापरास प्रतिबंध घालण्याकरिता वेळोवेळी विविध जनजागृती कार्यक्रम राबवत आहे. तरीदेखील नागरिक, दुकानदार, फेरीवाले प्लास्टिक वापरताना आढळून येतात. या सगळ्यावर चाप बसावा याकरिता मुरबाड नगरपंचायतचे मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी प्लास्टिक वापरकर्त्यांवर कठोर कारवाई करण्याकरिता एक विशेष पथक तयार केले आहे. या पथकाद्वारे गेले दोन दिवस शहरात दंडात्मक कारवाई चालू असून ३६ किलो प्लास्टिक जप्त करून दंड आकारण्यत आला आहे. तरी मुरबाड नगरपंचायतद्वारे सर्वांना आवाहन करण्यात येते की, प्लास्टिकचा वापर कमी करून कापडी पिशवीचा वापर करावा.

# बुलेट ट्रेन प्रकल्पातील कामगारांना पथनाट्यातून सुरक्षित कामाचा मंत्र!

## नाट्यातून नऊ हजार कामगारांना सुरक्षा, जागरूकता यांचे पटवले महत्त्व

**प्रशांत सिनकर**

**ठाणे :** बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम सुसाट वेगाने सुरू असताना, प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांची सुरक्षा तितकीच महत्त्वाची आहे. काम करताना कोणत्याही कामगाराला दुखापत होणार नाही याची काळजी संबधित विभाग घेत आहे. मात्र कामगारांनी देखील सुरक्षित काम कसे करावे यासाठी "प्रयास" नावाच्या पथनाट्याची मालिका सुरू केली आहे. प्रकल्पाच्या ५० ठिकाणी पथनाट्यातून सात हजार कामगारांना सुरक्षेचा मंत्र आणि त्याचे फायदे समजावले आहेत.

परदेशात अथवा चित्रपटात धावणारी बुलेट ट्रेन सर्वांनीच पहिली असली तरी आता प्रत्यक्षात पुढच्या काही दिवसात धावताना दिसणार



आहे. मुंबई-ठाणे-पालघर जिल्ह्यातून थेट गुजरात राज्याला जोडणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पाची उत्सुकता सर्वांना लागून आहे. त्यामुळे प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांना उत्साह वाढवा आणि सुरक्षित काम करता यावे यासाठी पाठ नाट्यातून कामगारांना सजग करण्याचा प्रयत्न केला आहे. जून २०२४ मध्ये, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत "प्रयास" नावाच्या पथनाट्याची मालिका आयोजित केली होती. ही मालिका प्रकल्पाच्या ५० साईट्सवर आयोजित करून सात हजार कामगारांना सुरक्षिततेचे महत्त्व आणि फायदे याबद्दल जागरूक केले.

आता पथनाट्याचा दुसरा टप्पा डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झाला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व ठिकाणी पथनाट्ये पूर्ण झाली आहेत. सुमारे दोन हजारकामगारांनी या प्रयत्नात भाग घेतला आणि सुरक्षिततेच्या जागरुकतेच्या फायद्यांशी परिचित झाले. हा प्रयत्न कामगारांना सुरक्षित आणि सुरक्षित कामाची जागा देण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, विक्रोळी, घणसोली, ठाणे, नालासोपारा, विरार, पालघर आणि दहाद्रू परिसर अशा विविध ठिकाणी ही पथनाट्ये सादर करण्यात आली.

### भाडे थकविल्याने ठेकेदार काळ्या यादीत

## कपोते वाहनतळावर पालिकेचा ताबा

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील दिवंगत दिलीप कपोते वाहनतळाच्या ठेकेदाराने १ कोटी ८८ लाख ११ हजार १६८ रुपयांचे भाडे पालिकेकडे जमा केले नव्हते. ही रक्कम भरण्यासाठी पालिकेने वारंवार नोटिसा पाठवूनही ठेकेदार भाडे भरत नव्हता. यामुळे पालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलीप कपोते वाहनतळाचा ठेकेदाला बाजूला करत वाहनतळ ताब्यात घेण्याची कार्यवाही केली. मागील फेब्रुवारीमध्ये या वाहनतळाचे उद्घाटन करण्यात आले होते. मे. कुमार एन्टरप्रायझेस, मे. गुरूदत्त एन्टरप्रायझेस या दोन खासगी एजन्सी संयुक्त भागीदारीमधून हे वाहनतळ चालवित होत्या. सुरुवातीचे दोन महिन्याचे भाडे ठेकेदारांनी नियमितपणे पालिकेला दिले. मे ते नोव्हेंबर या कालावधीतील १ लाख ८८ हजार रुपयांचे भाडे भरण्यास ठेकेदार टाळाटाळ करत होते. ही रक्कम भरणा करावी म्हणून पालिका मालमत्ता कर विभागाने ठेकेदारांना नोटिसा पाठविल्या होत्या. दरम्यान ठेकेदार भाड्याची थकित रक्कम भरणा करत नसेल, तर त्या वाहनतळाचा ताबा पालिकेने घेऊन



ते चालविण्यास सुरुवात करावी. तसेच ठेकेदारांचे या वाहनतळावरील नियंत्रण काढून टाकावे असे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, मालमत्ता विभाग उपायुक्त रमेश मिसाळ यांना दिले. वाहनतळाचा ताबा घेण्यासाठी उपायुक्त प्रसाद बोरकर, साहाय्यक आयुक्त सविता हिले, नियंत्रण अधिकारी प्रसाद ठाकुर, अधीक्षक जयराम शिंदे, प्रशांत धीवर यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. सुरूवातीला ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांनी वाहनतळाचा ताबा देण्यास नकार दिला. ठेकेदाराच्या महिला कर्मचारी दाद देत नसल्याने उपायुक्त मिसाळ यांनी उपायुक्त अतुल झेंडे यांना संपर्क करून महात्मा फुले पोलीस ठाण्यातून वाढीव पोलीस बंदोबस्त मागविला. पोलिसांनी आक्रमक कारवाई करून ठेकेदारांच्या कर्मचाऱ्यांना वाहनतळातून बाहेर काढले. उपस्थितांच्या समक्ष पंचनामा करून पालिकेने कपोते वाहनतळाचा ताबा घेतला.

## मीरा-भाईंदरमध्ये १० नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र कार्यान्वित

◆ **भाईंदर (वार्ताहर):**

मीरा-भाईंदर शहरातील आर्थिक दुर्बल घटकांची वस्ती (झोपडपट्टी) असलेल्या भागात महाराष्ट्र शासनाच्या सार्वजानिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महापालिकेने १० नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू केली असून त्यात दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत परिसरातील नागरिक विनामुल्य आरोग्य सेवेचा लाभ घेत आहेत.

मीरा-भाईंदर महापालिकेची ११ आरोग्य केंद्र असून त्यात सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत नागरीकांना औषध उपचार उपलब्ध आहेत. याच बरोबर नागरीकांना तसेच विषेश करून आर्थिक दुर्बल घटकांची वस्ती असलेल्या भागात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजानिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार




**आर्थिक दुर्बल घटकांना लाभ**

महापालिकेने ३५ आरोग्यवर्धिनी केंद्र प्रस्तावित केली होती. त्यातील १० नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मीरा गावठाण, घोडबंदर गाव, मीरा गाव जवळील मुनशी कंपाऊंड भागात तसेच भाईंदर पूर्व आणि पश्चिम भागातील आर्थिक दुर्बल घटकांची वस्ती असलेल्या भागात कार्यान्वित केली असून इतर २५ केंद्र नियोजित ठिकाणी होणार आहेत. नुकतेच मीरा गावातील मुनशी कंपाऊंड भागात सुरू झालेले आरोग्यवर्धिनी केंद्र भाजपाच्या तत्कालीन नगरसेविका वीणा भोईर यांच्या सन २०२१-२२ च्या नगरसेवक निधीतून १५ लाख रुपये वापरून बांधण्यात आलेले आहे. केंद्रात एक एमबीबीएस डॉक्टर, १ नर्स यांच्यासह ५ कर्मचाऱ्याचे पथक दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत नागरीकांना औषध उपचार उपलब्ध करून देत असतात. त्यामुळे परिसरातील अनेक गरजू नागरिक या केंद्राचा लाभ घेत आहेत.

## महाराष्ट्रात सातशे अंगणवाड्यांतून दहा हजार मुलांना शिक्षण

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

मुलांना खेळातून शिक्षण देण्याबरोबरच अंगणवाडी ताईनी त्यांच्या आई होऊन शिक्षण दिले, तर या मुलांना शिक्षणाची आवड निर्माण होईल, आणि हे काम रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू झाले आहे. महाराष्ट्रात सुमारे ७०० अंगणवाडीतील १० हजार मुलांना असे शिक्षण देण्याच्या या उपक्रमाचे उद्घाटन कल्याण तालुक्यातील रायते येथे झाले असल्याचे एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे यांनी जाहीर केले.

आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, रिलायन्स फाउंडेशनने कोकण विभागात ठाणे जिल्ह्यात २४ अंगणवाड्या बांधण्यात आल्या आहेत, याचे प्राथनीधीक उद्घाटन तालुक्यातील रायते येथे शुक्रवारी झाले, या अंगणवाडीत खेळातून शिक्षण, दिले जाणार आहे. ग्रामीण भागात अंगणवाडयाचा प्रश्न गंभीर आहे, तरीही महापोषणमध्ये ठाणे जिल्हाने चांगले काम केले आहे. कुपोषण कमी झाले आहे, गरोदरपणात अंगणवाडी सेविका काळजी घेत असल्याने कुपोषण कमी होत आहे, पण तरीही पहिल्या एका तासात केवळ ६८टक्केच महिला



**रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून शिक्षणाची आवड निर्माण करण्याचे काम सुरू**

आपल्या बाळाला दुध पाजतात, हे गंभीर असल्याचे सांगून याकडे शासन विशेष लक्ष देत असल्याचे सांगितले.

यानंतर रायते पिंपळोली ग्रुपग्रामपंचायतीच्या सरपंच समिता सुरोशे या म्हणाल्या,आमच्या गावात अंगणवाडी बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती, मात्र माझी झेडपी सदस्यां जयश्री सासे यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे आज या अंगणवाडया उभ्या राहिल्या आहेत. तर अंगणवाडी सेविका सुंनदा पवार यांनी आपले अनुभव उपस्थितीतां समोर मांडले. जिजाऊ संघटनेच्या अस्मिता शिंगोळे यांनी रिलायन्स फाऊंडेशन ने केलेल्या कामाबद्दल कौतुक केले. यावेळी रिलायन्स फांऊडेशनच्या नुपूर बहल यांनी अंगणवाडी केंद्राविषयी माहिती दिली.

याप्रसंगी व्यासपीठावर डेप्युटी कमिशनर संगीता लोंढे, ठाणे जिल्हा परिषदेचे बालविकास विभागाचे संजय बागूल, संतोष भोसले, कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये, सरपंच समिता सुरोशी, सहाय्यक बीडिओ आर के गवारी, बालविकास अधिकारी, अर्चना पवार, तसेच या विभागाच्या मुख्य सेविका, विस्तार अधिकारी, रायते शाळेचे एस एस पाटील, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक राजा सुरवसे, आदी मंडळी उपस्थित होते.

## 'टिटवाळ्यातील समस्या सोडवा अन्यथा आंदोलन करू'

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

मांडा-टिटवाळा परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत वारंवार पत्र देऊनही महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. यासाठी माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांनी महापालिका आयुक्त डॉ इंदुराणी जाखड यांची भेट घेतली व समस्या सांगितल्या. समस्या नाही सोडविल्यास (१७ डिसेंबर) महापालिका मुख्यालया समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

मांडा टिटवाळ्यातील गृह संकुलांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून पाणीपुरवठा जास्त दाबाने व वेळेवर सोडणे, मोहिली जलशुद्धीकरण केंद्र येथुन मांडा टिटवाळासाठी येणाऱ्या मुख्य पाण्याच्या लाईनवर प्रेशरगेज मशीन बसवणे, अनधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई करावी, काळू नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवणे व गळती थांबविण्यासाठी उपाययोजना करणे, अशा विविध समस्या असून त्या सोडवण्यासाठी महापालिका प्रशासनाने लक्ष द्यावे अन्यथा महापालिका मुख्यालया समोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांनी दिला आहे.

## 'मेट्रो प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी प्रयत्नशील राहू'



◆ **कल्याण (वार्ताहर) :**

कल्याण लोकसभेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाच्या नावाखाली आणि कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांच्या योग्य पाठपुराव्यामुळे मेट्रो जमीन प्रकल्प बाधित स्थानिक शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी शिवसेनेचे शिष्ठाचार मंडळ सोबत घेऊन राजेश मोरे यांनी लिखित प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे संबंधित विभागाकडे सुपूर्द केला. विकासकामे होत असताना स्थानिक भूमिपूत्र व शेतकरी यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील राहू अशी ग्वाही यासमयी आमदार राजेश मोरे यांनी दिली. याप्रसंगी सुभाष पाटील -विभागप्रमुख (लोढा पलावा) गजानन पाटील -कृषी उत्पन्न बाजार समिती, प्रकाश पाटील -विभाग प्रमुख -निळजेगाव, गिरीधर पाटील -माजी सरपंच, महेश पाटील -शाखा प्रमुख निळजेगाव, अमोल भोगले -उपतालुकाप्रमुख तसेच अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

## 'नागरिकांनी ऊर्जा संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा'

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

ऊर्जेची बचत ही सद्यस्थितीत काळाची गरज बनली असून ऊर्जा संवर्धनासाठी महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी देखील पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन कल्याण-डोंबिवली महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी केले. विद्युत विभागामार्फत महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या ऊर्जा संवर्धन सप्ताहाच्या शुभारंभ समयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.

ऊर्जा संवर्धन म्हणजे जबाबदारीने ऊर्जेचा वापर करणे होय. भारतातील ७० टक्के वीज निर्मिती ही कोळशापासून होते आणि आता कोळशाचे आयुष्यमान सर्वत्र कमी होत आहे त्यामुळे पुढील पिढीसाठी हे नैसर्गिक स्त्रोत जतन करावयाचे असतील तर ऊर्जा संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने उचलली पाहिजे, तरी आवश्यकता नसताना विजेचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेचे विद्युत



**ऊर्जेची बचत ही काळाची गरज**

विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी यावेळी केले.

संपूर्ण देशभरात १४ डिसेंबर हा ऊर्जा संवर्धन दिन तसेच १४ ते २० डिसेंबर या कालावधीत ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या विद्युत विभागाकडूनही दरवर्षी ऊर्जा संवर्धन सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी महापालिका मुख्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करण्यात आली.

या ऊर्जा संवर्धन सप्ताहात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विद्युत विभागाकडून तीन आकर्षक माहिती पत्रके तयार करण्यात आली आहेत. यापुढील आठवडाभर देखील विद्युत विभागाकडून कल्याण-डोंबिवलीतील विविध सार्वजनिक ठिकाणी आणि गृहसंकुलात ऊर्जा संवर्धन आणि बचतीबाबत जनजागृती केली जाणार आहे.

यावेळी विद्युत विभागाबाबत तयार करण्यात आलेल्या आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आणि ऊर्जा बचत आणि संवर्धनाची शपथ महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

## एनएमएमटीचे 'चालते फिरते' ग्रंथालय बंद

**नवी मुंबई :** नवी मुंबई परिवहन सेवेच्या २६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून एनएनएमटी बसमध्ये प्रवाशांसाठी 'बुक्स इन बस' या उपक्रम सुरू केला होता. मराठी, इंग्रजी भाषेतील वाचनीय पुस्तके उपलब्ध करून दिली होती. याचा शुभारंभ तत्कालीन आयुक्त बांगर यांच्या उपस्थितीत केला होता. अनेक पुस्तकप्रेमींनी या उपक्रमाचे कौतुकही केले. सुरुवातीला मंत्रालय, बोरीवलीकडे जाणाऱ्या वातानुकूलित गाड्यांमध्ये संस्थेने दिलेली मराठी, इंग्रजीतील नामवंत लेखकांची पुस्तके झळकली.

वर्षभरापूर्वीपर्यंत ही पुस्तके निर्दशनास येत होती. मात्र आता ही योजना पूर्णतः बंद झाल्याचे दिसत आहे. सध्या एकाही बसमध्ये पुस्तक उपलब्ध नसून केवळ पुस्तकाचे ग्रंथालय धूळखात पडल्याचे चित्र दिसत आहेत. दरम्यान या विषयी लेट्स रिड इंडिया फाऊंडेशनच्या सदस्यांशी संवाद साधला असता त्यांनी पुस्तके देण्याचे काम संस्थेने केले आहे. त्यानंतर त्याचे नियोजन व जबाबदारी ही परिवहनची आहे, असे त्यांनी सांगितले.

### कर्मचाऱ्यांच्या अपार मेहनत, कार्यक्षमतेमुळे कामकाज पारदर्शकपणे पडले पार

## विधानसभा निवडणुकीत काम केलेल्या कर्मचाऱ्यांचा गुणगौरव

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत ठाणे जिल्ह्यातील निवडणुकीच्या कामातील सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अतिशय उत्कृष्टपणे कामे केली. त्यांच्या अपार मेहनत, कार्यक्षमतेमुळेच ही निवडणूक पारदर्शकपणे पार पडली असल्याचे गौरवोद्गार जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी काढले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये काम केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन



येथे पार पडला. त्यावेळी शिनगारे यांच्या हस्ते निवडणुकीत विविध पथकांमध्ये नियुक्त केलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, जिल्हा सूचना अधिकारी नरेंद्र भांबरे आदी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, सार्वत्रिक निवडणुकीत प्रत्येकानेच अतिशय सजगपणे कामे केली. प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सहभागानेच ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. आचारसंहितेसंदर्भात आलेल्या तक्रारींचे निवारण अतिशय जलदगतीने झाले. ठाणे जिल्ह्यातील काही मतदार संघात गेल्या निवडणुकीच्या वेळी अतिशय कमी मतदान झाले होते. यंदा मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे उद्दिष्ट होते. स्विप पथकाने केलेल्या जनजागृतीमुळे मागील निवडणुकीपेक्षा यंदा जिल्ह्यात ९ टक्के जास्त मतदान झाले आहे. त्याच बरोबर इतर सर्व पथकांनी सर्व अडचणी, प्रश्न, टिका यांना सामोरे जात क्षमतेने कामे केली आहेत. या सर्वांच्या सहकाऱ्यांमुळेच ठाणे जिल्ह्यातील निवडणुकीच्या कामाचे मुख्य निवडणूक अधिकारी तसेच माजी ज्येष्ठ सनदी अधिकारी यांनी कौतुक केले.

अतिरिक्त जिल्हाधिकारी जायभाये यांनी देशाच्या पहिल्या निवडणुकीपासून ते आतापर्यंतच्या निवडणुकीचा मागोवा घेऊन सांगितले की, पहिल्या निवडणुकीत देशातील सर्वच पात्र नागरिकांना मतदानाचा पवित्र हक्क मिळावा, यासाठी पाऊले उचलण्यात आली होती. ती परंपरा आजही सुरू असून कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक यंत्रणा काम करत आहे. निवडणूक प्रक्रिया ही अविरत चालणारी प्रक्रिया असून ठाणे जिल्ह्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी ही प्रक्रिया पारदर्शकपणे व योग्यरित्या पार पाडल्याचे त्यांनी सांगितले.तसेच निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. माने यांनी निवडणुकीच्या मनुष्यबळ व्यवस्थापनात आलेले अनुभव कथन केले. तसेच निवडणूक काळात काम केलेल्या सर्वांचा गौरव केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांचे आभार मानले.

## नवी मुंबईत दत्तजयंती उत्साहात

◆ **नवी मुंबई (प्रतिनिधी) :**

नवी मुंबईतील विविध ठिकाणच्या दत्त मंदिरांमध्ये दत्तजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ठाणे-बेलापूर पट्टीतील जागृत देवस्थान म्हणून सानपाडा येथील दत्त मंदिर ओळखले जाते. येथील ट्रस्टच्या वतीने दत्त जयंतीनिमित्त १० ते १४ डिसेंबरपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गुरुचरित्र पारायण, काकड आरती, हरिपाठ, आरती, भजन आदी धार्मिक कार्यक्रम झाले. तसेच दत्त जन्माचे सुश्राव्य किर्तन किर्तनकार भगवताचार्य मनोहर महाराज गिरी यांनी सादर केले. रात्री महाप्रसाद तसेच ८.३० नंतर पालखी मिरवणूक मंदिराभोवती पाच प्रदक्षिणा घालून



गावदेवी मंदिरापर्यंत काढण्यात आली होती. यावेळी सनातन संस्थेसह अन्य अध्यात्मिक आणि धार्मिक संस्थांनी विविध ठिकाणच्या मंदिराच्या परिसरात अध्यात्मिक ग्रंथांचे "ग्रंथ प्रदर्शन" भरवले होते. तसेच वाशी परिसरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. त्याचबरोबर सीबीडी, नेरूळ, जुईनगर, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली या भागांमधील दत्त मंदिरांमध्ये दत्तजयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



बुधवार पेठेतील (कै.) लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर विद्युत रोषणाईने सजले. (छाया : मंदार टण्णू)

## वेचक

### कोथरूडमध्ये ३ लाखांचा गांजा जप्त

**पुणे :** खुनाचा प्रयत्नासह गंभीर गुन्हे दाखल असलेल्या गुंडाला अमली पदार्थ विरोधी पथकाने लोणी काळभोरमधून अटक केली. त्याच्याकडून तीन लाख रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. साहिल विनायक जगताप असे अटक करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे. साहिल आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्यात आली होती. कारागृहातून तो नुकताच सुटला होता. दरम्यान तो अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्यावर पाळत ठेवली होती.





### पुण्यात आगीचे सत्र सुरूच



**पुणे :** शहरातील कोंढवा, येरवडा आणि शिवाजीनगर भागात चार ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. कोंढवा परिसरातील येवलेवाडीत सोफा निर्मिती करणाऱ्या कारखान्यात आग लागल्याने गंभीर भाजलेल्या एकाचा मृत्यू झाला. कोंढव्यातील येवलेवाडी भागात सोफा निर्मिती करणारा कारखाना आहे. दुपारी दीडच्या सुमारास कारखान्यात आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. कारखान्यात ठेवलेल्या एका छोट्या सिलिंडरचा स्फोट झाला होता. कारखान्यात वेल्डिंगचे काम सुरू असल्याचे या भागातील रहिवाशांनी सांगितले. जवानांनी पाण्याचा मारा करून तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत कारखान्यातील कामगार हरुण अहमद खान हे गंभीर होरपळले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली.

### पंचकल्याणक महोत्सवात अमोघ कीर्तीजी महाराज यांचे प्रवचन

**पिंपरी :** या पृथ्वीवर भगवान प्रत्येकाला व्हायचे आहे. पण सगळ्यांकडे ती क्षमता नसते. जे तीर्थंकर होतात, ते पुन्हा जन्मास येत नाहीत. हे पद तुम्हाला कष्टाने आणि कर्मानेच मिळवावे लागते, असे प्रतिपादन १०८ अमोघकीर्तीजी महाराज यांनी व्यक्त केले. भगवान महावीर दिगंबर जैन मंदिर व भगवान महावीर अहिंसा ट्रस्ट प्राधिकरण यांच्या वतीने आयोजित पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवात तिसऱ्या दिवशी ते बोलत होते. शुक्रवारी पारंपरिक पद्धतीने पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रम झाले. हा महोत्सव आजही (ता. १५) चालणार आहे. निगडी प्राधिकरण येथील सेक्टर क्रमांक २७-अ नियोजित महापौर निवास मैदान येथे दीवाण बहादूर अण्णासाहेब लठ्ठे व्यासपीठावर हा महोत्सव होत आहे.



# पुण्यात पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला अनोखा विश्वविक्रम

## कलाकृती साकारण्यासाठी ४ हजार १८९ पुस्तकांचा वापर

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला पुस्तकांचा वापर करून सरस्वती चिन्ह साकारण्याचा विश्वविक्रम नोंदवण्यात आला. विविध निकषांवर मूल्यमापन करून 'गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड'च्या अधिकाऱ्यांनी विश्वविक्रम नोंदवला गेल्याची अधिकृत घोषणा करून प्रमाणपत्र प्रदान केले. या विश्वविक्रमासाठी ४ हजार १८९ पुस्तकांचा वापर करण्यात आला. तसेच विश्वविक्रमासाठीची कलाकृती किमान एक हजार चौरस मीटरची असणे, सुस्थितीत असलेल्या पुस्तकांचा वापर, जागा रिकामी न राहणे, पाच वेगवेगळे रंग असणे अशा विविध निकषांवर या कलाकृतीचे मूल्यमापन करण्यात आले. त्यानुसार साकारलेली कलाकृती पात्र ठरून विश्वविक्रम नोंदवला गेला आहे, अशी घोषणा प्रवीण पटेल यांनी केली.

राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या आनुषंगाने विश्वविक्रम नोंदवण्याच्या कार्यक्रमावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चित्रा वाघ, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद मराठे, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीचे अध्यक्ष किरण ठाकूर, पुणे पुस्तक महोत्सवाचे संयोजक राजेश पांडे, कृष्णकुमार गोयल, संयोजन समितीचे सदस्य प्रसेनजित फडणवीस, बागेश्री मंठाळकर, ॲड. मंदार जोशी, डॉ. संजय चाकणे, गिनेस वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत अधिकारी प्रवीण पटेल, मिलिंद वर्लेकर या वेळी उपस्थित होते. विश्वविक्रमी कलाकृतीसाठी नीलकंठ प्रकाशन, राष्ट्रीय पुस्तक न्यास यांच्या पुस्तकांचा वापर करण्यात आला.



### मुलांच्या मोबाइल वापराबाबत गांभीर्याने विचार करा

सांस्कृतीक नगरी असलेल्या पुण्यात असलेली विचारांची पोकळी भरून काढण्यासाठी पुस्तक महोत्सव, चर्चा होणे महत्त्वाचे आहे. ऑस्ट्रेलियाने लहान मुलांच्या मोबाइल वापरावर बंदी घातली आहे. मुलांची दिशाभूल होणारे साहित्य मोबाइलवर येणार याची काळजी घेतली पाहिजे. केंद्र सरकार डीपफेकविरोधात कायदा करत आहे. मात्र मुलांच्या मोबाइल वापराबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नमूद केले.

### वाचनाने व्यक्तिमत्त्व होते समृद्ध

वाचनाने व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. त्यामुळे वाचन अत्यंत महत्त्वाचे आहे. हा महोत्सव केवळ पुण्यात न करता त्याची चळवळ होण्यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये हा महोत्सव झाला पाहिजे. लोकांना वाचायला आवडते, त्यांना तसे मंच उपलब्ध करून दिले पाहिजेत, असे चित्रा वाघ यांनी सांगितले.

### पुणेकरांचे पुस्तकांवर प्रेम

पुणेकरांचे पुस्तकांवर किती प्रेम आहे हे पुणे पुस्तक महोत्सवाला मिळत असलेल्या प्रतिसादावरून दिसून येते. यंदा पुस्तक प्रदर्शनासह साहित्य, खाद्य, सांस्कृतिक महोत्सव, बालचित्रपट महोत्सव होणार आहे. यंदाच्या महोत्सवाचा प्रारंभ सरस्वती यंत्राचा विश्वविक्रम नोंदवून होत आहे, याचा आनंद असल्याचे पांडे यांनी सांगितले.

#### आयुक्तांच्या हस्ते उद्‌घाटन

# पिंपरी-चिंचवडमध्ये आता 'पोलीस दवाखाना'



◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी पोलीस दवाखाना सुरू केला आहे. दवाखान्याचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. पोलीस हे २४ तास ऑनड्युटी राहतात. त्यांच्या प्रकृतीवर अनेकदा परिणाम होतो. आजार देखील उद्‌भवतात. त्यामुळेच अशा सुसज्ज असा पोलीस दवाखाना सुरू करण्यात आला आहे.

पोलीस म्हणालो की, ताण तणाव हा नक्कीच असतो. भारत हा असा देश आहे ज्या ठिकाणी सण-उत्सव सर्वात जास्त साजरे केले जातात आणि याच सण-उत्सवात सुरक्षेची जबाबदारी आणि काही अनिश्चित प्रकार घडू नये म्हणून पोलीस हे तत्पर राहतात. यामुळेच ते अनेकदा त्यांच्या कुटुंबासमवेत सण आणि उत्सव देखील साजरे करत नाहीत. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून ते २४ तास कार्यरत असतात. कामाचा ताण आणि शारीरिक, मानसिक थकवा आल्याने स्वतःकडे देखील लक्ष देण्याची वेळ पोलिसांकडे बहुतांशदा नसते. अनेक आरोग्याचे प्रश्न उद्‌भवतात. हेच हेरून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने वाकड परिसरातील कावेरी नगर येथे पोलीस दवाखाना कार्यान्वित केला आहे.

या हॉस्पिटलसाठी डॉ. राधाकृष्ण पवार यांचे मोलाचे योगदान लाभलं आहे. वैद्यकीय अधिकारी श्रीमती अनुपमा कांबळे, डॉ. संजय भारती यांच्यासह आठ जणांचा स्टाफ या ठिकाणी नियुक्त करण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात एकूण ४,९२७ महिला आणि पुरुष अधिकारी आणि कर्मचारी कार्यान्वित आहेत.

त्यांचे आरोग्य सांभाळण्यासाठी पोलीस दवाखाना सुरू करण्यात आल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले आहे.

### दुरुस्तीच्या कामासाठी आज रेल्वे फाटक बंद

**पुणे :** पुणे ते मिरज रेल्वे मार्गावरील वाठार आणि पळशी दरम्यान असलेल्या रेल्वे फाटक क्रमांक ४७ हे देखभाल - दुरुस्तीच्या कामासाठी रविवारी (ता. १५) सकाळी सात ते सायंकाळी सातपर्यंत बंद राहणार आहे. याचा परिणाम रस्ते वाहतुकीवर होणार आहे. यामुळे रस्ते वाहतूक वाठार-पिंपोड-दहिगाव-देऊर, वाठार-दहिगाव- देऊर व वाठार-तळीये- बिचुकले-गुजरवाडी-पळशी या मार्गाने होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.



# 'कवितेकडे कविता म्हणून पाहिले पाहिजे'

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

जुने चष्मे नव्या काळात उपयोगी पडत नाहीत. स्त्रियांची कविता आणि पुरुषांची कविता असा भेद न करता कवितेकडे कविता म्हणून पाहिले पाहिजे.

असे मत ज्येष्ठ कवी प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले. माजी आमदार अनंत गाडगीळ यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेला दिलेल्या देणगीतून देण्यात येणारा 'सुनीताबाई गाडगीळ स्मृती साहित्य पुरस्कार' यंदा ज्येष्ठ कवयित्री डॉ. पद्मरेखा धनकर आणि नवोदित कवयित्री प्राजक्ता माळी यांना प्रवीण दवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी, माजी आमदार अनंत गाडगीळ आदी उपस्थित होते.

दवणे म्हणाले, धनकर आणि माळी यांच्या कविता आत्मसंवादी आहेत. धनकर म्हणाल्या, केवळ टाळ्या ही चांगल्या कवितेची पावती असू शकत नाही. चांगली कविता मनात रेंगाळत राहते. माळी म्हणाल्या, कविता आणि अभिनय ही दोन टोके आहेत.

अभिनय करताना मुखवटे धारण करावे लागतात. परंतु कविता स्वतःशी प्रामाणिक राहून लिहावी लागते.

# न्यायालयास बनावट ३० 'टोनर'ची विक्री करत फसवणूक

## व्यावसायिका विरुद्ध गुन्हा दाखल

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

शिवाजीनगर न्यायालयात न्यायालयीन कामकाजाकरीता वापरण्यात जाणाऱ्या प्रिंटरसाठी दिलेले ३० टोनर बनावट असल्याचे उघडकीस आले आहे. एका नामवंत टोनर निर्मात्या कंपनीच्या नावे न्यायालयीन प्रशासनाला बनावट टोनरची विक्री करण्यात आली. याप्रकरणी न्यायलयीन प्रशासनाला टोनर, तसेच संगणकीय साहित्य विक्री करणाऱ्या व्यावसायिकाविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यााबाबत शिवाजीनगर न्यायालयातील कर्मचारी उत्तम थोरात यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, व्यंकटेश्वरा इन्फोटेक मंगलम ब्रेझा या कंपनीच्या संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. थोरात शिवाजीनगर जिल्हा न्यायालायात प्रशासकीय कर्मचारी आहेत. शिवाजीनगर न्यायालयातील कामकाजासाठी त्यांनी ३० टोनरची मागणी संबंधित कंपनीकडे लेखी पत्राद्वारे केली होती. त्यानंतर संबंधित टोनर न्यायालयातील नाझर कार्यालयात देण्यात आले. संबंधित टोनर एका नामवंत कंपनीच असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, टोनर खराब असल्याचे उघडकीस आल्यानंतर ते कंपनीस परत करण्यात आले. त्यानंतर न्यायालयीन प्रशासनाला पुन्हा ३० टोनर देण्यात आले. हे टोनर देखील खराब असल्याचे उघडकीस आले. थोरात यांनी टोनर निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधला. त्यावेळी टोनर बनावट असल्याचे त्यांनी सांगितले. थोरात यांनी न्यायालयीन प्रशासनाला टोनर पुरवठा करणाऱ्या कंपनीविरुद्ध फसवणुकीची तक्रार दिली. या सर्व प्रकरणाचा सहायक पोलीस निरीक्षक संजय पांढरे तपास करत आहेत.





# ग्रामीण भागात वीजबिल भरण्यास 'महापॉवर-पे' ला चांगला प्रतिसाद

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

निमशहरी व ग्रामीण भागात वीजबिल भरणे सोयीचे करणाऱ्या तसेच छोट्या व्यावसायिकांना उत्पन्न मिळवून देणाऱ्या महावितरणच्या महापॉवर-पे या पेमेंट वॉलेटला प्रामुख्याने कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांसह पश्चिम महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

गेल्या सहा महिन्यांत १६ लाख ६ हजार ६६२ वीजग्राहकांनी १७७ कोटी ४२ लाख रुपयांच्या वीजबिलांचा वॉलेटद्वारे भरणा केला आहे, तर कमिशनपोटी वॉलेटधारकांनाही ८० लाख ३३ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. आतापर्यंत ६०१ जणांनी 'महापॉवर-पे' वॉलेटच्या माध्यमातून वीजबिल भरणा केंद्र सुरू केले आहे. महावितरणने महापॉवर-पे हे पेमेंट वॉलेट सुरू केले आहे. १८ वर्षांवरील व्यक्ती तसेच छोटे व्यावसायिक, किराणा, मेडिकल, जनरल स्टोअर्स दुकानदार, बचत गट, विद्यार्थी, महावितरणचे वीजबिल वाटप एजन्सी व मीटर वाचन करणार्या संस्था वॉलेटधारक होऊ शकतात. हे वॉलेट मोबाईल किंवा संगणकाद्वारे वापरले जाते आणि डेबिट, क्रेडिट कार्ड व नेटबँकिंगने रिचार्ज करण्याची ऑनलाइन सोय आहे. वीजबिल भरण्यासाठी वॉलेटधारकास प्रतिपावती पाच रुपये कमिशन देण्यात येत आहे. महापॉवर-पेचे वॉलेटधारक होण्यासाठी इच्छुकांनी महावितरणच्या विभागीय, उपविभागीय कार्यालयांशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे प्रादेशिक संचालक भुजंग खंदारे यांनी केले आहे. पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने ग्रामीण भागातील १ लाख १२ हजार ३५८ ग्राहकांनी वॉलेटद्वारे १६ कोटी ९६ रुपयांचा भरणा केला. यात संबंधित ५६ वॉलेटधारकांना ५ लाख ६१ हजार रुपयांचे कमिशन देण्यात आले.



# 'काँग्रेसने देशात आणीबाणी लादून संविधानाचा अवमान केला'

◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

भाजपाचे प्रणित केंद्र सरकार संविधान बदलतील असा आरोप करणाऱ्या काँग्रेसनेच देशांमध्ये आतापर्यंत ७२ वेळा संविधानात बदल केला. १९७५ मध्ये देशामध्ये आणीबाणी संविधानाचा अवमान केला. संविधान निर्मितीचे काम केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत दोन वेळा पाडण्याचे काम काँग्रेसने केले, अशी टीका माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांनी केली.

भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहरच्या वतीने नवनिर्वाचित आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप यांचा शाल, श्रीफळ, पगडी आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. निगडी प्राधिकरण येथील ग.दि. माडगूळकर प्रेक्षागृहात हा कार्यक्रम झाला. त्याप्रसंगी रावसाहेब दानवे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, अमित गोरखे, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, दक्षिण आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, माजी महापौर माई ढोरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, मोरेश्वर शेडगे, कार्यकारी अध्यक्ष बापू काटे, चंद्रकांत नखाते, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, शितल शिंदे, शैला मोळक, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, आरपीआयचे अध्यक्ष कुणाल वाव्हळकर, विजय फुगे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, कैलास कुटे, गणेश लंगोटे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दानवे म्हणाले की, विरोधकांकडून आमच्यावर ईव्हीएम घोटाळ्याचा संशय व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूकमध्ये आम्हाला अपयश आले होते. मग तेव्हा ईव्हीएम घोटाळा झाला नव्हता का, माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार हे भाजपाला जातीयवादी म्हणतात. त्यांनी १९९५ मध्ये आमच्या सोबत युती केली होती. उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी देखील एकेकाळी भाजपासोबत युती केलेली आहे. मात्र त्यांना आत्ताच आम्ही कसे जातीयवादी वाटायला लागलो, पदे घेताना वाटलो नाही.

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना (उबाठा) गटाला उद्देशून रावसाहेब दानवे म्हणाले, ना शिवसेना शिल्लक राहील ना राष्ट्रवादी काँग्रेस. भाजपाचे एकेकाळी २ खासदार होते. त्याचे आता ३०२ खासदार झालेत.





### कपडे शिवून ठेवा, अचानक निरोप येऊ शकतो...

पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांपैकी एकाला मंत्रिपद द्या, अशी मागणी कार्यक्रमादरम्यान पदाधिकाऱ्यांनी केली. हाच धागा पकडून रावसाहेब दानवे हे आमदार महेश लांडगे आणि शंकर जगताप यांना उद्देशून म्हणाले, भाजपामध्ये धक्कादायक निरोप येतात. कपडे शिवून ठेवा. अचानक निरोप येऊ शकतो.

### महापौर भाजपाचा होणार...

आगामी महापालिका निवडणूक भाजपाने स्वबळावर लढवावी, अशी भूमिका पदाधिकारी यांनी यावेळी मांडली. तसेच भाजपाचा महापौर होईल असा, दावा ही करण्यात आला. त्यावर दानवे म्हणाले, आगामी महापालिका निवडणुकांसाठी एकदिलाने काम करा, आपला विजय निश्चित आहे. असा विश्वास रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला.

## निर्यात वाढविण्यासाठी राज्य सरकारचे पाऊल!

# 'महाराष्ट्र एक्स्पोर्ट कन्वेन्शन २०२४-२५' ही कार्यशाळा उत्साहात

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

निर्यात वाढविण्यासाठी राज्य सरकारकडून उद्योगांसाठी विविध प्रोत्साहनपर योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती उद्योजकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राने पुढाकार घेतला आहे. यासाठी केंद्राच्या वतीने चाकण औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांशी थेट संवाद साधण्यात आला.

जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने चाकणमधील गॅब्रिएल इंडिया कंपनीत 'महाराष्ट्र एक्स्पोर्ट कन्वेन्शन २०२४-२५' ही कार्यशाळा झाली. यावेळी उद्योग सहसंचालक शैलेश रजपूत, सहविकास आयुक्त मित्तल हिरेमठ, भारतीय टपाल विभागाचे संदीप बटवाल, भारतीय निर्यात संघटनांच्या महासंघाचे (एफआयईओ) ऋषि मिश्रा, अपेडाच्या सुनिता सावंत, अभियांत्रिकी निर्यात प्रोत्साहन परिषदेचे (ईईपीसी) प्रतापसिंग भद्रा, जिल्हा उद्योग केंद्राच्या सरव्यवस्थापक वृषाली सोने आदी उपस्थित होते.

यावेळी मापारी यांनी उद्योगांना जागा व इतर सवलतींबाबत मार्गदर्शन केले. रजपूत यांनी राज्य शासनाच्या निर्यात धोरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन करुन विविध टप्प्यावर मदत करण्याचे आश्वासन दिले. हिरेमठ यांनी विशेष आर्थिक क्षेत्रामधील (एसईझेड) उद्योगांच्या सुविधा व योजनांबाबत मार्गदर्शन केले. पुष्पा गंगावणे यांनी निर्यातीभिमुख उद्योगांच्या सवलती व कार्यपद्धतीबाबत तर बटवाल यांनी टपाल विभागाच्या निर्यातीच्या सेवांबाबत माहिती दिली. एफआयईओचे ऋषी मिश्रा यांनी निर्यातीच्या आनुषंगाने, सुनिता सावंत तसेच प्रतापसिंग भद्रा यांनी कृषी निर्यात सवलती व सुविधांबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकरी संस्था व उत्पादक, प्रक्रिया उत्पादन, केंद्र, बँका आदींचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# पुणे-मऊ जंक्शन दरम्यान चालवणार कुंभमेळा ट्रेन

◆ **पुणे (वार्ताहर) :**


कुंभमेळा हा एक धार्मिक उत्सव केवळ आता धार्मिकच नाही तर त्याला सांस्कृतिक महोत्सवाचेही स्वरूप आले आहे. या महोत्सवातून संस्कृतीचे दर्शन होते. येत्या १३ जानेवारी २०२५ पासून प्रयागराजमध्ये हा कुंभमेळा आयोजित केला जाणार आहे, तो भव्य करण्यासाठी, प्रशासन पासून पूर्णपणे तयार आहे. तसेच प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेत पुणे ते मळ जंक्शन दरम्यान कुंभमेळा विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. तसेच गाडी क्रमांक ०१४५५ पुणे-मऊ जं. कुंभमेळा स्पेशल ट्रेन पुण्याहून ८ जानेवारी, १६ जानेवारी, २४ जानेवारी, ०६ फेब्रुवारी, ०८ फेब्रुवारी आणि २१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.१० वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी २२.०० वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक ०१४५६ मऊ - पुणे कुंभमेळा विशेष गाडी मऊ येथून २३.५० वाजता ०९ जानेवारी, १७ जानेवारी, २५ जानेवारी, ०७ फेब्रुवारीड, ०९ फेब्रुवारी आणि ०९ फेब्रुवारी आणि ट्राय. तिसऱ्या दिवशी १५.४५ वाजता पुण्याला पोहोचेल.



तर दौंड कॉर्ड लाईन, अहमदनगर, बेलापूर, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, तलवडिया, छनेरा , खिरकीया, हरदा, बानापुरा, इटारसी, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छियोकी, चुनार, वाराणसी, शहागंज आणि आझमगड हे थांबे असणार आहेत.

इतकेच नव्हे तर या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट दिल्यास संपूर्ण माहिती मिळणे शक्य होणार आहे. तसेच प्रवाशांनी याची नोंद घ्यावी आणि या गाड्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

# बांगलादेश अफगाणिस्तानच्या दिशेने...





स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

बांगलादेशातील उद्रेकाने शेख हसीना सरकार उलथवल्यानंतर तेथे इस्लामिक कट्टरतावाद्यांना हिंसाचार व रक्तपात घडवायला रान मोकळे मिळाले आहे. पाकिस्तान समर्थित कट्टरतावाद्यांनी देशातील अल्पसंख्य असलेल्या हिंदूंना हल्ल्याचे टार्गेट बनवले आहे. हिंदूंना घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे, अनेक मंदिरांवर हल्ले करून तेथील देवदेवतांच्या मूर्तींची तोडफोड करण्यात आली आहे. इस्कॉन मंदिराला आग लावण्यात आली. बांगलादेशातील हिंदूंकडे देशाचे शत्रू म्हणून बघितले जात आहे. बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढ्यात भारताचे योगदान सर्वात मोठे होते, पण आज ५३ वर्षांनंतर इस्लामिक कट्टरतावाद्यांच्या हिट लिस्टवर भारताचा क्रमांक पहिला आहे. जनतेतील प्रक्षोभ आणि बेलगाम हिंसाचारानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना स्वतःलाच देशातून पलायन करावे लागले आणि त्यानंतर बांगलादेशमध्ये भारत द्वेष आणि हिंदू विरोध उफाळून आला आहे.

हिंदूंवर हल्ले होत असताना युनूस सरकार हल्लेखोरांना रोखण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई करताना दिसत नाही. पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. प्रशासन हल्लेखोरांपुढे हतबल झाले आहेत. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांच्या निषेधार्थ भारतात देशभर हिंदू संघटनांनी रस्त्यावर उतरून निदर्शने केली. महाराष्ट्रातही अनेक शहरात हिंदू संघटनांनी शक्तिप्रदर्शन घडवून बांगलादेशातील हिंदूंच्या पाठीशी भारतीय जनता खंबीरपणे उभी असल्याचे दाखवून दिले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात निलेश राणे, नितेश राणे या आमदार बंधूंनी विराट मोर्चा काढून हिंदूंची संघटित ताकद रस्त्यावर उतरवली. बांगलादेशात हिंदूंच्या विरोधात होत असलेल्या हिंसाचाराबद्दल जागतिक स्तरावर अनेक देशांनी चिंता प्रकट केली. ब्रिटनच्या संसदेतही हा मुद्दा मांडला गेला. अमेरिकेच्या व्हाइट हाऊसनेही हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराची गंभीर नोंद घेतली. बांगलादेशमध्ये नोबेल पारितोषिक विजेत्या मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार असले तरी ते त्यांचा भारत विरोधी अजेंडा सोडायला मुळीच तयार नाहीत.

काश्मीरच्या खोऱ्यात १९९० च्या दशकात पंडितांवर हल्ले होत होते, पंडितांना घरात घुसून ठार मारले जात होते, पंडितांना त्यांच्या परिवारासह अंगावरच्या वस्त्रानिशी खोऱ्याबाहेर पळून जाण्यास भाग पाडले जात होते, हिंदू महिलांवर अत्याचार व बलात्कार झाले. आता त्याच घटना बांगलादेशात घडत आहेत. बांगलादेशातील हिंदूंना तिथे जिणे मुश्कील केले जात आहे. काश्मीरच्या खोऱ्यात हिंदूंवर अत्याचार करणारे इस्लामिक कट्टरतावादी होते आणि बांगलादेशातही तेच आहेत. त्यांच्या पाठीशी पाकिस्तान प्रेरित कट्टरतावादी संघटना व गुप्तचर संघटना आहेत. पाकिस्तानातून या देशात शस्त्रास्त्रे येत आहेत. हसीना शेख यांच्या कट्टर राजकीय विरोधक बेगम खलिदा झिया व पाकिस्तानी अधिकारी यांच्यात संवाद होत असल्याच्याही बातम्या आहेत. शेख हसीना यांना सत्तेवरून पदच्युत केल्यानंतर बांगलादेशच्या माध्यमातून पाकिस्तानी गुप्तचर संघटना भारताला व हिंदूंना टार्गेट करीत आहेत. पाकिस्तानची पहिली शिकार ही बांगलादेशातील हिंदू आहेत, त्यांच्यावर अत्याचार व हल्ले होत आहेत. बांगलादेशात सैन्याच्या मदतीने भारताच्या विरोधात मोहीम सुरू करणे हा पाकिस्तानच्या रणनितीचा दुसरा भाग असू शकतो आणि तिसरा भाग म्हणजे भारतीय बनावटीच्या वस्तूंवर व साधनसामग्रीवर बांगलादेशात बहिष्कार पुकारणे, त्यातून भारताची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न करणे. देशात हिंदू विरोधी हिंसाचाराच्या घटना वाढल्यावर बांगलादेशाने कोलकता व त्रिपुरा येथून आपले दूतावासातील अधिकाऱ्यांना विचारविनिमय करण्यासाठी बोलावून घेतले. एवढेच नव्हे तर बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबूर रहमान यांचे बांगलादेशच्या चलनी नोटांवरून फोटो काढून टाकण्याचे फर्मान निघाले. मोहम्मद युनूस सरकारने भारताबरोबर झालेला मोबाईल इंटरनेट कनेक्टिव्हीटी समझोता रद्द केला आहे. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना त्याचा फटका बसणार आहे. हा समझोता शेख हसीना सरकारने केला होता. भारताच्या ईशान्येकडील राज्यात मोबाइल इंटरनेट कनेक्टिव्हीटी चांगली नाही. रिजनल डिजिटल हबच्या माध्यमातून बांगलादेश सीमेवर इंटरनेट सर्किट स्थापन करण्यात येणार होते. त्यातून ईशान्येकडील राज्यांना डेटा ट्रान्समिशन सुविधा उपलब्ध होणार होती. हे काम भारती एअरटेलने समीट कम्युनिकेशन या बांगलादेशी कंपनीच्या मदतीने पूर्ण करायचे होते. बांगलादेश टेलिकम्युनिकेशन रेग्युलेटरी कमिशनने त्याला मंजुरीही दिली होती. पण युनूस सरकारने या कराराचा बांगलादेशला काहीही आर्थिक लाभ नाही, असे कारण देऊन करार रद्द करून टाकला. समीट कम्युनिकेशनचे चेअरमन मोहम्मद फरिद हे शेख हसीना यांच्या अवामी लीगच्या खासदारांचे धाकटे भाऊ आहेत. दोन देशांतील संबंध सुरळीत व्हावेत यासाठी भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी मोहम्मद युनूस यांची ढाक्यात जाऊन भेट घेतली. शेख हसीना सत्तेवरून पायउतार झाल्यावर भारत-बांगलादेशातला हा पहिलाच संवाद होता. दि. ५ ऑगस्ट २०२४ला हसीना यांच्याविरोधात मोठा उठाव झाला व त्यांना भारतात आश्रय घेणे भाग पडले. बांगलादेशात निदर्शकांनी लुटालूट-जाळपोळ व सरकारी मालमत्तांचे मोठे नुकसान केले. जनक्षोभापुढे पोलीस व सुरक्षा दलांनी शस्त्रे खाली टाकली. आज या देशात इस्लामिक कट्टरतावाद्यांकडून हिंदूंवर अत्याचार होत असताना, हिंदूंची मंदिरे व मालमत्ता यांना आगी लावल्या जात असताना पोलीस बघ्याची भूमिका घेत आहेत. हसीना व अवामी लिगचे नेते हे निदर्शकांचे टार्गेट आहे. राजकारणी, कलावंत, नोकरशहा, पत्रकार, बुद्धिमंत, सामाजिक नेते असे शेकडो जण स्वतःचा जीव वाचविण्यासाठी आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये आश्रयाला आहेत. बांगलादेशातील हिंदू हे अवामी लिग व शेख हसीनाचे समर्थक म्हणून ओळखले जातात म्हणून हसीना विरोधकांचे व कट्टरतावाद्यांचे सॉफ्ट टार्गेट हिंदू बनले आहेत. बांगलादेशच्या बांगला व इंग्रजी वृत्तपत्रांतूनही हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांची आकडेवारी प्रसिद्ध झाली आहे. भारताने चिंता व्यक्त केली, तर तो आमचा अंतर्गत मुद्दा आहे असे उत्तर युनूस सरकारने दिले आहे. हसीना यांनी भारतात पलायन केल्यावर अवामी लिगच्या हजारो नेते, पदाधिकारी यांनी देशाबाहेर जाण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना सीमेवर रोखण्यात आले. हसीना सरकारमधील अनेक मंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवण्यात आले आहेत. कट्टरतावाद्यांच्या विरोधात लिहिणाऱ्या पत्रकारांनाही अटक करण्यात आली आहे. भारतीय माध्यमांनीच बांगलादेशमधील चित्र भडकपणे रंगवले असा आरोप युनूस सरकारकडून केला जात आहे.

भारतात आश्रयाला असलेल्या हसीना सतत युनूस सरकारच्या विरोधात भाष्य करून बांगलादेशातील वातावरण प्रक्षोभक बनवतात, असाही आरोप केला जात आहे. कोलकत्ता, त्रिपुरा या दोन शहरांशी बांगलादेशवासीयांचा दैनंदिन संबंध आहे. दोन्ही देशांत परस्परांचे नातेसंबंध आहेत. रोटी-बेटी व्यवहार आहेत. व्यापार-उद्योगासाठी दोन्हींकडून ये-जा मोठ्या संख्येने आहे. पण आता वातावरण बिघडले आहे. सीमेवर दोन्ही देशांची सुरक्षा दले आहेत. बांगलादेशने तर पाकिस्तानी नागरिकांना व्हिसाची गरज नाही असे जाहीर करून पाकिस्तानला ये-जा करण्याचा मुक्त परवाना दिला आहे. आम्ही एकवेळ तुरुंगात राहू पण बांगलादेशात परतणार नाही, असे त्रिपुरामधील बांगलादेशी हिंदूंनी म्हटले आहे. त्रिपुरात बांगलादेशविरोधात मोठी निदर्शने झाली. बांगलादेशात उच्चायुक्तांच्या कार्यालयाची मोडतोड झाली. त्रिपुराला तर बांगलादेशने तीनही बाजूंनी वेढलेले आहे. पश्चिम बंगाल, आसाम, मेघालय, त्रिपुरा, मिझोराम ही राज्ये बांगलादेश सरहद्दीजवळ आहेत. कोलकत्ता नि आगरतळा येथून ढाका येथे नियमित बस सेवा आहे. व्यापार, उद्योग, औषधोपचार, नातेसंबंध यासाठी हजारो बांगलादेशी भारतात नियमित ये-जा करीत असतात. दोन देशांत आयात-निर्यातही मोठी आहे. बांगलादेशाने भारतावर निर्बंध लादून आता पाकिस्तानशी सलोखा निर्माण केला आहे. कराची ते चटगाव जहाज वाहतूक सुरू झाली आहे. ढाकामध्ये भारतीय उत्पादनावर बहिष्कार घालण्यात आला आहे. भारतीय वस्तूंची होळी केली जात आहे.

मोहम्मद युनूस हे देशात शांततेसाठी प्रयत्न करतील व नवे सरकार स्थापनेसाठी वातावरण निर्माण करतील अशी अपेक्षा होती. पण ते कट्टरपंथीयांच्या आहारी जाऊन काम करीत आहेत की काय अशी शंका वाटू लागली आहे. बांगलादेशाच्या निर्मितीसाठी लाखो बांगलादेशींनी बलिदान दिले होते, त्याची आठवणही कोणाला राहिलेली नाही. उलट कट्टरपंथी बांगलादेशी पाकिस्तानलाच आपला रहनुमा मानू लागले आहेत. इस्लामिक कट्टरवाद्यांचा भारत द्वेष व पाकिस्तान प्रेम उफाळून येत आहे. पाकिस्तानने काही वर्षांपूर्वी अस्थिर झालेल्या अफगाणिस्तानात तालिबान उभे केले व त्यात त्या देशाची कशी वाताहत झाली हे सर्व जगाने बघितले आहे. बांगलादेशातही पाकिस्तानचा हाच प्रयोग सुरू झाला, तर बांगलादेश दुसरा अफगाणिस्तान होण्याच्या दिशेने जाईल...

sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in

# भाषांवरचे संकट नि नवी पिढी



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

डिसेंबर महिन्याच्या शेवटी सरत्या वर्षाचा आलेख आणि नव्या वर्षाचे नवीन संकल्प या सर्वांचा ताळमेळ सुरू होतो. एक मराठीप्रेमी म्हणून डिसेंबर महिन्यातील एका सांस्कृतिक परंपरेची मला आठवण होते. मी बोलते आहे ग्रंथाली वाचकदिनाबद्दल. गेली वर्षे ग्रंथालीचा वाचक दिन साजरा केला जातो. साहित्यिक चौकटीपुरता मर्यादित न राहता ग्रंथालीचा वाचक दिन विविध कलात्म परिमाणाना भिडतो आहे. दृश्य कला, चित्रपट, व्यंगचित्रे अशा विविध पैलूंशी निगडित विविध कार्यक्रमांची मेजवानीच ग्रंथाली देणार आहे.

या वर्षीच्या वाचकदिनातील एक पैलू उल्लेखनीय आहे. तो म्हणजे साहित्य जगतातील तरुण लेखकांशी नि कवींशी सुसंवाद. यानिमित्ताने विविध साहित्य प्रकारांत लिहिणारे तरुण चेहऱ्यांचे एका व्यासपीठावर येणे मला महत्त्वाचे वाटते. आज आपली भाषा, आपले साहित्य, समाज संस्कृतीविषयक प्रश्न याविषयी तरुणाईला काय वाटते या प्रश्नाच्या उत्तरातच मराठीचे भवितव्य दडलेले आहे.

मी मध्यंतरी एका इंग्रजीतील सेमीनारकरता गेले होते. वसाहतवादी मानसिकतेने काय परिणाम झाले, या दृष्टिकोनातून चर्चा सुरू होती. एखाद्या परक्या देशाच्या आक्रमणाने आपल्याच देशात आपण अनोळखी कसे होत जातो यावर ही चर्चा खूप रेंगाळली. यातून तयार होणाऱ्या भाषिक न्यूनगंडाचे बळी आपण कसे ठरतो, हेही नोंदवले गेले. एक चुणचुणीत मुलगी उभी राहिली नि म्हणाली, आपल्या देशात अनेक अंगांनी ज्ञानाचा विकास झाला, पण तरी जणू कुठली पार्श्वभूमी आपल्याकडे नाहीच असेच मानून आपण इंग्रजांना शरण गेलो. नि आज आपण परत आपल्या भाषाकडे वळू शकत नाही.

आपल्या समाजाची झालेली 'गोची' या मुलीने नेमकी बोलून दाखवली होती. म्हणजे आपले चुकतेय कुठे ते कळतेय पण चूक सुधारायची आपली मानसिक तयारीच नाही. मग आपण अभ्यासक्रमांमध्ये शिकतो. परिसंवादांमध्ये चर्चा करतो. या चर्चा नि प्रश्न विचारणे, छाप पाडणे, चर्चेतून समोरच्यांवर प्रभाव टाकणे यातच आपण खूश असतो. उत्तरे सापडली तरी त्यांचा स्वीकारच जणू करायचा नसतो. सेमीनार संपल्यावर त्या मुलीला मी विचारले, 'इंग्रजांनी प्रदीर्घ काळ राज्य केल्यावर आपले काय नुकसान झाले नि आपल्या भाषा आपण कशा दुबळ्या केल्या हे तर छान मांडलेस पण मला सांग, तुमची पुढली पिढी तरी मातृभाषांकडे वळणार आहे का? पालक म्हणून तुम्ही तुमच्या मुलांना मातृभाषेतून शिकवाल का?" ती निरुत्तर झाली. तिचा निरुत्तरपणा मात्र खूप बोलका होता.



काही दिवसांपूर्वी काही मुले एका उपक्रमाकरिता माझी मुलाखत घ्यायला आल्या. खूप उत्सुकता होती त्यांना. मातृभाषेबद्दलच्या प्रश्नानी मुली अस्वस्थ झाल्या आहेत, हे जाणवले नि आशा पालवली. आपल्या भाषा टिकल्या पाहिजेत हे नव्या पिढीला जाणवते आहे. त्या आपणच टिकवायच्या नि वाढवायच्या आहेत, हे नव्या पिढीला जाणवेल तेव्हा आज अस्वस्थ करणारे भाषांवरचे संकट टळेल.

# प्रेरणादायी लेडी बॉस

आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. ऊन-पाऊस, थंडी-वारा यांची तमा न बाळगता अगदी देशाच्या सीमेवर खडा पहारा देण्याचे सगळ्यात कठीण काम देखील महिलांची फौज करते. इतकी गुणवत्ता असून देखील काही विकृत स्वभावाच्या व्यक्ती महिलांना चुकीच्या पद्धतीने वागवतात. त्यांचे शोषण करतात. या विकृतीला ती सुद्धा बळी पडली होती. मात्र ती डगमगली नाही. उलट या विकृत कृतीला तिने व्यवसायात रूपांतर करत आज एक चळवळ उभारली आहे. ही गोष्ट आहे बी आर्टसीच्या प्रमुख शिखा मित्तल यांची.



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

शिखा मित्तल आणि तिचे वडील छोटे बांधकाम करत. या कामात त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नातून कुटुंबाला उदरनिर्वाह करणे कठीण जात होते. मात्र त्या परिस्थितीत देखील त्यांनी आपल्या दोन मुली आणि मुलाला उच्च शिक्षण दिले. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट केले. त्यामुळेच शिखाचा मोठा भाऊ आता फॅशन डिझायनर आहे आणि तिची धाकटी बहीण कर्करोगाच्या रुग्णांसाठी विग तयार करण्याच्या प्रकल्पावर काम करत आहे. शिखाने केंब्रिज स्कूल, श्रीनिवासपुरी, दिल्ली येथे शालेय शिक्षण घेतले आणि खालसा कॉलेजमधून इतिहास विषयाची पदवी मिळवली. नंतर, तिने मास कम्युनिकेशन्समध्ये पदव्युत्तर पदविका आणि आयआयएम, बंगलोरमधून उद्योजकीय अभ्यासात पदविका प्राप्त केली. शिक्षण पूर्ण करत असतानाच शिखा काम देखील करू लागली. शिखा अवघ्या २१ वर्षांची असताना रेडिओ स्टेशनवर तिच्या पहिल्या इंटर्नशिपदरम्यान तिला लैंगिक छळाचा पाहिला अनुभव आला. तिला तिच्या बॉसने आपल्या कारमध्ये घरी सोडण्याची ऑफर दिली. त्यावेळेस तिला त्याच्या हेतूबद्दल यत्किंचितही कल्पना नव्हती. बोलता बोलता त्या नराधम बॉसने तिच्या स्कर्टखाली हात सरकवला. आपल्या बॉसच्या अशा वागण्याने ती भेदरली. एका ट्रॅफिक सिग्नलवर कार थांबताच तिने दरवाजा उघडला आणि त्याच्यापासून आपली सुटका करून घेतली.

अशाच प्रकारे तिला इतर नोकऱ्यांमध्ये देखील लैंगिक छळ सहन करावा लागला, परंतु त्याला कसा प्रतिसाद द्यायचा हे तिला माहीत नव्हते. तिला वाटायचं की, ती पीडित आहे कारण तिला त्रास देणाऱ्यांना माहीत होते की ती मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे आणि नोकरी गमावणे तिला परवडणारे नव्हते. या असहाय्यतेचा ते गैरफायदा घेऊ इच्छित होते. काही बॉस म्हणाले, तर तिला थेट बोलायचे की जर तिला बढती हवी असेल आणि पगार वाढवायचा असेल तर तिला त्यांच्यासोबत शय्यासोबत करावी. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळापासून वाचण्यासाठी तिने आठ नोकऱ्या बदलल्या होत्या. मात्र, त्याचा काही उपयोग झाला नाही. तिने जॉइन केलेल्या प्रत्येक कंपनीत तिला लैंगिक छळाचा अनुभव आला. हे असे भयंकर अनुभव घेतल्यानंतर तिने तिची कॉर्पोरेट नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला ते घाबरून पळून जाण्यासाठी नव्हे तर या विकृतीविरोधात लढा देण्यासाठी. महिलांना लैंगिक छळाबद्दल जागृत करण्यासाठी तसेच महिलांसाठी कामाची ठिकाणे अधिक सुरक्षित करण्यासाठी एक संस्था उभारण्याचे तिने ठरवले. २०१० मध्ये तिने बी आर्टसी सुरू केले. तिने २०११ मध्ये पेप्सिको (भारत)साठी पहिला जनजागृती कार्यक्रम केला. त्यावेळेस तिला व्होडाफोनकडून ४ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळाले. त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. सुरुवातीस तिने तब्बल ५००० कंपन्यांशी संपर्क साधला. त्यापैकी १४ कंपन्यांमध्ये तिचे कार्यक्रम झाले. शिखाला वाटायचे की कंपन्या लैंगिक छळासंबंधी जागृती करण्यास अनिच्छुक आहेत कारण त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात लैंगिक छळाची प्रकरणे हाताळण्यासाठी योग्य कार्यप्रणाली नाही. अनेक कंपन्यांकडे विश्वासार्ह संस्था नाही. जिथे महिला लैंगिक छळाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी संपर्क करू शकतात. जर अशी संस्था असेल तर ते केवळ औपचारिकतेसाठी आहे, दुसरे काही नाही. शिखा आपल्या कार्यक्रमांद्वारे, ती लैंगिक छळ म्हणजे काय आणि कंपनीच्या अंतर्गत तक्रार समिती (ICC) कडे छळाची प्रकरणे कशी नोंदवायची याबद्दल जागरूकता निर्माण करते. १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या कोणत्याही कंपनीकडे अंतर्गत तक्रार समिती (आयसीसी) असणे आवश्यक आहे. या समितीला पीडित महिला ईमेलद्वारे, वैयक्तिकरीत्या किंवा कॉलद्वारे संपर्क साधू शकतात; परंतु शिखाने ज्या ठिकाणी कार्यक्रम केले त्या सर्व कंपन्यांकडून प्रतिक्रिया सकारात्मक होत्या. कार्यक्रम घेतलेल्या कंपन्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळाबद्दल गंभीर असल्या तरी, या कार्यक्रमांमुळे त्यांना हा विषय अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत झाली आणि कर्मचाऱ्यांमध्ये या विषयाबद्दल असलेला सामाजिक समज दूर झाला.

शिखाने एक स्वावलंबी व्यवसाय मॉडेल तयार केले आहे. तिच्या संस्थेची पहिल्या वर्षीची उलाढाल ४ लाख रुपये होती. दुसऱ्या वर्षी ती ११ लाख रुपये झाली. आता ही उलाढाल काही कोटी रुपयांच्या घरात आहे. शिखाने सुरू केलेल्या कंपनीमध्ये आता १६ नियमित कर्मचारी आहेत आणि १४ भाषांमधील पथनाट्य सादर करणारे १००० पेक्षा जास्त कलाकारांचे नेटवर्क आहे ज्यांना आवश्यकतेनुसार बोलावले जाते. आतापर्यंत तिने भारतातील २६ राज्यांमधील १०६ शहरांतील ४१ पेक्षा अधिक नामांकित कंपन्या आणि ३६० हून अधिक संस्थांमध्ये ५००० पेक्षा जास्त जनजागृती कार्यक्रम केले आहेत. सुमारे ५ लाख कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला आहे. यामध्ये अमेरिकन एक्स्प्रेस, एअर इंडिया, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, व्होल्वो, पेप्सिको इंडिया, टाटा मोटर्स, एशियन पेंट्स, रेकिट बेंकिसर आणि बऱ्याच कॉर्पोरेट कंपन्यांचा समावेश आहे. लैंगिक छळ जनजागृती व्यतिरिक्त, शिखाने महिलांसाठी आर्थिक साक्षरता प्रदान करणारा 'बी युवर ओन लक्ष्मी' हा कार्यक्रमही तयार केला आहे. हा ४० तासांचा कार्यक्रम आहे. जिथे ती महिलांना त्या आर्थिकदृष्ट्या कुठे आहेत याची जाणीव करून देतात. त्यानंतर त्यांना त्यांचे आर्थिक व्यवस्थापन आणि आर्थिक वृद्धी करण्यास शिकवले जाते. शिखाच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सगळेच कौतुक करतात. शिखाने कामाच्या ठिकाणी जो लैंगिक छळाचा अनुभव घेतला आहे तसा अनुभव बहुतांश महिलांना येतो; परंतु अनेकजणी मौन बाळगतात, काही छळाला बळी पडतात, तर काहीजणी करिअर सोडून देतात. शिखा मात्र मानसिकदृष्ट्या कणखर बनून सक्षमपणे उभी राहिली. इतकंच नव्हे तर संस्था उभारून आज ती जनजागृती करते आणि त्यातून अर्थार्जन सुद्धा करते. खऱ्या अर्थाने शिखा ही प्रेरणादायी लेडी बॉस आहे.



शिखा मित्तल

# दिवावात

आईच्या संस्कारमयी कुपीतील दिवा-वातीची मोट, तिन्ही सांजेच्या वातावरणात शरीर बुद्धीला चालना देते. ह्या वातरूपी अध्यात्मिक परंपरा प्रकाशाकडे जाताना, चिरकाल ठसा उमटवतात माझ्या मनावर. दिव्याने दिवा पेटवावा, आसमंत तेजोमय व्हावा. एक दिवा देवापाशी लावताना, चिरकाल तरुण ठेवणाऱ्या वातीची खरी जादू म्हणजे माझी माय, जी दिवावातीच्या भेटीला प्रेम बहाल करते.





मोरपीस

पूजा काळे

आपल्या आसपास लुकलुकणारे दिवे म्हणजे शाश्वत चैतन्य प्रकाश. सूर्योदयाला पूर्वेकडून येणारी स्वयंप्रकाशी दिव्यज्योत रत्नाकरची खासियत आहे. चराचरातल्या प्राणीमात्रांना जिवंत ठेवण्यासाठी, कार्यमग्न राहण्यासाठी दिनकराने केलेली ही व्यूहरचना अद्भुत आहे. जगण्याचं अभिवचन देत, त्यांचं येणं आणि सूर्यास्ताला निरोप घेत जाणं हा ऊर्जेचा मूळ उगम जे आपल्या जगण्याचं स्त्रोत आहे. त्यानंतर येतो मंद प्रकाश दिव्यातून सांडत जाणारा मनाचा अधिकारक शशिकांत, जो हुरहुरणं, हळहळणं वाढवत नेतो. विविध कलांनी घायाळ करणारा चंद्र सौम्य प्रकाशात न्हाऊ घालतो. प्रेमात पडावं एवढं त्याचं रूप पूनव रातीला गारुड घालतं मनावर. मनोबल वाढवणाऱ्या, कमजोर करणाऱ्या या ग्रहाबद्दलचं आकर्षण स्वस्थ बसू देत नाही आपल्याला. त्यानंतर येतात तारका, चांदण्या. चमचमणाऱ्या, चंदेरी, तेजस्वी तारका शोभा वाढवतात नभीची. हे दूत जोवर आहेत म्हणजे सूर्य, चंद्र, तारे उगवत राहतील तोवर माणूस नावाच्या प्राण्याला मरण नाही हे शाश्वत सत्य स्वीकारत त्यांच्या पुढे नतमस्तक होतो आपण. आपले दिवस आनंदात जातात. या आनंदात सहभागी असतात ते शहरातील टिमटिमणारे दिवे जे रस्त्याबरोबर आपल्यालाही जागं ठेवतात. त्यांचा प्रकाशमयी कार्यभाग प्राणीमात्रांच्या जीवनाला गती देणारा असतो. आयुष्यातलं दिव्याचं स्थान महत्त्वाचं आहे. दिवा शब्दात नतमस्तक होण्याची भावना आहे. नाना प्रकारच्या दिव्यांमध्ये मानाचे, ज्ञानाचे, कलेचे, समारंभाचे, निरोपाचे, संस्कृतीचे दिवे त्याचप्रमाणे अंधार दूर करणारे अंजन घालणारे दिवे आणि वंशाचे दिवे सुद्धा येतात. या ना त्या कारणाने लाख दिवे आपल्या आसपास असतात. तेव्हा स्वतःला एक उत्तम माणूस मानून आपण देवाजीची निर्मिती आहोत हे जाणून वागलो, मानापमानाचे दिवे योग्य वेळी योग्य जागी सांभाळले की, वितुष्ट येत नाही.

कुठल्याही कार्यक्रमाच्या सुरुवातीचं दीपप्रज्वलन म्हणजे सोहळ्याची सुरुवात, जी सरस्वती आणि गणेश स्तवनाने दीप प्रज्वलित करून केली जाते, दिव्याचं महत्त्व असं अबाधित आहे. त्याशिवाय गुरूकडून प्राप्त झालेले ज्ञान दिव्यज्योती अनंतरूप धारण करते. आपल्यात बदल घडवणारे गुरू अज्ञान, अंधकाराला ज्ञानार्जनाच्या पायवाटांवर आणून सोडतात. मानवाला शांती प्रदान करतात. दुसरीकडे संस्कृती, कलेचा दिवा तुम्हाला यशाची पायरी सर करण्यास मदत करतो. ज्याच्या मनात कलेची, साहित्याची अन् संस्काराची विण घट्ट असते त्याचा विश्वास वृद्धिंगत करणारा मार्गदर्शक दिवा त्याची सोबत पुरवतो. यानंतर येतो घरातला वंश दिवा. हा विषय नाजूक तरी महत्त्वाचा. आपल्या मानसिक भावना वंशदिव्याच्या आसपास असतात. दिवा स्वरूपात पृथ्वीतलवार आलेली बालिका वा बालकाचा आनंदाने स्वीकार करतो. देवाचे आभार मानतो आपण. त्या वंशवेलाची किमया न्यारी असते, जी जीवन सुकर करते. जन्माबरोबरचं मृत्यूचाही एक दिवा सोबत घेऊन येतो आपण. जिव्हेवर तुळशीपत्र ठेवून मार्गस्थ होताना आठवणींचा (स्मृतींचा) एक दिवा ठेऊन जातो इतरांसाठी.



यानंतर येणारा संस्काररूपी दिवा ज्याने माझे आयुष्य ऊजळवले. "देव घरामध्ये दिवा जळतो, प्रभूवर पडतो प्रकाश, मी तर निरंजनातील वात". दिवावातीचं महत्त्व सांगणारी माझी माय नव्याण्णवाव्या वर्षीही तुपातली वात होऊन तेवते. आईच्या भक्तिमय अभंगातल्या या ओळी माझ्यातील जाणिवा-जागृती आजही जिवंत ठेवतात. आईच्या संस्कारमयी कुपीतील दिवा-वातीची मोट, तिन्ही सांजेच्या वातावरणात शरीर बुद्धीला चालना देते. ह्या वातरूपी अध्यात्मिक परंपरा प्रकाशाकडे जाताना, चिरकाल ठसा उमटवतात माझ्या मनावर. दिव्याने दिवा पेटवावा, आसमंत तेजोमय व्हावा. एक दिवा देवापाशी लावताना, चिरकाल तरुण ठेवणाऱ्या वातीची खरी जादू म्हणजे माझी माय, जी दिवावातीच्या भेटीला प्रेम बहाल करते. तिची दीपमाळ मैलोनमैल पसरलीय. तिच्या शाखा मुलं, बाळं, नातवंड, पतवंडात विसावलेल्या पाहिल्या की, नतमस्तक होते मी. काही वंश-पिढ्या ह्या दीर्घायुषी असतात याचा प्रत्यय माझी ९२ वर्षिय आत्या, ९४ वर्षिय मामी पाहताना होतो. वयाची ९८ आणि ८५ पार केलेले माझे मामा आणि मावशी जे आज हयात नसले तरी, त्यांच्याविषयी माझा भाव तोच आहे. अखंडित तेवणाऱ्या यादीत निरांजनी दिव्यासारखी माझी माणसं त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्ती बळावर प्रकाशित होतात तेव्हा सांजवात उजळते. दत्त महाराजांच्या प्रसन्न तसबिरी समोर प्रकाश पसरतो. मनाची मरगळं दूर होते. घंटानादाने आसमंत भारतो. मांगल्याच्या खुणा या अशा जगायला शिकवतात.

*देवापुढे स्वस्तिकात*
*शोभे लाल पिवळा*
*यथासांग धर्माचार*
*दीप पूजन सोहळा*
*लक्ष गाठण्या यशाचे*
*एक सांगणे नित्याचे*
*ज्योत लाऊन मागते,*
*आई बळ सामर्थ्याचे....*

माऊलीच्या निरंजनातील वातीसवे धूप, अगरबत्तीने तुळस सजते. माऊलीच्या श्वासामध्ये दत्तनाम स्मरणाचा जयघोष अविरत चालू असतो. त्यावेळी माझ्या मनात भाव जागृत होतात. ते असे...

*पसरतो प्रकाश तुळशीशी*
*ती तेवत असते जोवर*
*अंगणाशी बसून छाया*
*दिवावात लावते तिथवर*
*तुपात मुरल्या वाती*
*दानाची भर तू झोळी*
*तव कृपा होऊ दे दत्ता*
*शरणागत तिन्हीसांजेला*
*आई तुला स्मरून करते*
*नमस्कार दीपज्योतीला...*

# चोरांचा मोर्चा शेतकऱ्यांच्या पिकांकडे

## भयभित — मुळुकवाडी येथे रात्रीतुन ७४ कट्टे सोयाबीन चोरीला

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चोरट्यांनी आता आपला मोर्चा शेतीमालाकडे वळवला असुन शेतातील कांदा पिक अथवा सोयाबीन रात्रीतुन चोरीला जाण्याचे प्रमाणात वाढ झाली असुन अगोदरच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.त्यातच महावितरणच्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे चोरांचे साधत असुन याबद्दल तिव्र नाराजी शेतकऱ्यांमध्ये दिसुन येते.शेतातील पिक चोरी जाण्याबरोबरच घरासमोरील सोयाबीन चोरीला नेण्याचे धाडस चोरट्यांनी दाखवत पोलिस प्रशासनाला आव्हान दिले आहे.

बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील अहमदपूर ते अहिल्यादेवी नगर राष्ट्रीय महामार्गावरील शिवाजी रंगनाथ ढास आणि रामदास रंगनाथ ढास यांचे घरासमोरील सोयाबीनचे ७४ कट्टे रात्री चोरट्यांनी लंपास केले असुन एकुण जवळपास पावणे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. चोरट्यांनी महामार्गावरून सोयाबीन कट्टे न नेता घराच्या मागच्या बाजूला असलेल्या ज्वारीच्या शेतातुन डोक्यावर वाहुन पाठीमागे पिक अप मध्ये टाकुन लंपास केले आहे. पहाटे साडेतीन वाजता शिवाजी ढास लघवीला बाहेर आल्यानंतर त्यांना सोयाबीनचे कट्टे चोरीला गेल्याचे कळाले. त्यांचा मुलगा कैलास ढास यांनी पहाटे ४ वाजता नेकनुर पोलिस स्टेशन येथे जाऊन कल्पना दिली.तेव्हा त्यांच्या सांगण्यावरून पेट्रोलिंगची गाडी विचारपूस करून गेली.व सकाळी १० वाजता लेखी तक्रार देण्यासाठी नेकनुर पोलिस स्टेशनला बोलावले असल्याचे कैलास शिवाजी ढास यांनी सांगितले.





मूळुकवाडी गावात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असुन गेल्या ४ दिवसांपासून वीजपुरवठा नाही.घराच्या दारात सोयाबीन ठेवलेल्या ठिकाणी मोठा फोकस आहे.परंतु रात्री वीज नसल्याने चोरट्यांचे साधले. महावितरणच्या गलथान कारभारामुळे चोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे खंडु ढास, अमोल पितळे, कैलास ढास यांनी सांगितले.



# घरकुलांचे प्रश्न तातडीने सोडवा

## दिलासा:अर्पिता ठुबेंकडून प्रत्यक्षात पाहणी !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या असून त्या त्या ठिकाणी असलेल्या घरकुलाच्या नरेगाच्या आणि इतरही समस्या जाणून घ्या आणि त्या तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत .गुरुवारी दिनांक १२ डिसेंबर रोजी त्यांनी सर्कलमध्ये सावळेश्वर पैठण ढाकेफळ आनंदगाव सारणी या गावांना भेट दे त्या ठिकाणी सुरू असलेल्या कामांना भेटी दिल्या यामध्ये घरकुल दलित वस्तीतील कामे अंगणवाडी जिल्हा परिषदच्या शाळांना त्यांनी भेटी दिल्या यावेळी त्यांचे समवेत पंचायत समितीचे ग्रामविकास अधिकारी काशीद बांधकाम विभागाचे अभियंता राजू हातागळे नरेगाचे खाकरे यांच्यासह संबंधित गावाचे सरपंच देखील उपस्थित होते. व यानंतर प्रलंबित कामाचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना शासकीय काम लवकरात लवकर पूर्ण करावे असे आदेश देण्यात आले .

पान २ वर...

# गुंडगिरीच्या विरोधात एकत्र येण्याची गरज!

## खा.पाटील: देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देणार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील सरपंच देशमुख यांची झालेली हत्या वेदनादायी आहे. घटनेच्या सात दिवसानंतरही सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. जोपर्यंत देशमुख कुटुंबाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही. आपण संसदेत हा विषय लावून धरू या भावना खासदार रजनी पाटील यांनी व्यक्त केल्या. सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची शनिवारी खासदार रजनी पाटील यांनी भेट घेतली. देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केल्यानंतर रजनी पाटील यांनी आपण देशमुख कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. यातील सर्व आरोपी अटक झाले पाहिजेत असे सांगितले. जोपर्यंत

पान २ वर...

# बीड-परळीत दहशतीचं वातावरण

## ॲड.शंकर चव्हाण : खंडणी,खून, गुत्तेदार-कार्यकर्त्यांचे गुंडाराज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सबंध बीड जिल्हयात गुन्हेगारीसाठी पोसलेल्या गुत्तेदार व राजकीय कार्यकर्ते यांच्या दहशतीमुळं भितीचं वातावरण तयार झाले आहे. बीड जिल्हयाचे आयपीएस अधिकारी पोलीस अधिक्षक हे नेमकं कशा प्रकारचं प्रशासन चालवत आहेत याचा काहीच जनतेला ताळमेळ लागेना झाला आहे. कारण संबंध बीड जिल्हयामध्ये गुन्हेगारी एवढी मोठया प्रमाणात फोफावली आहे की, जणू काही बीड जिल्हयाचा बिहारच झाला आहे असा जनतेला मोठा प्रश्न पडला असून पुन्हा एकदा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बीड जिल्हा हा उसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून देशाच्या नकाशावर त्याची ओळख आहे. मात्र आता ही ओळख गुन्हेगारीचा जिल्हा म्हणून स्थानिक पुढाऱ्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या कृपाशिर्वादामुळे बनली आहे.

निवडणुकीदरम्यान उमेदवारांना मारहाण, दबावतंत्र, कुरघोडया करुन निवडणुका जिंकल्या त्यामुळे लोकशाही धोक्यात जात आहे अशी भिती जनसामान्यांना वाटत आहे. बीड जिल्हयाचे पोलीस अधिक्षक हे सुध्दा सुरक्षेच्या प्रश्नांबाबत अपयशी ठरले आहेत असे बीड जिल्हयातील जनतेने समजावे का ? असा सवाल जनता करत आहे. एका पाठोपाठ एक अपाराधांचे सत्र सुरु असतांनाच पोलीस प्रशासन नेमकं करतंय तरी काय? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. खंडण्या, गोळीबार, मारहाण, अपहरण, हत्याकांड, जनावर सारखं अमानुष मारहाण अशा घटना घडत असतांना पोलीस प्रशासन मात्र यावर कसल्याही प्रकारची प्रतिबंधक कारवाई करताना दिसत नाही ?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे गृह खाते आहे. तरी सुध्दा सबंध राज्यात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी फोफावलेली दिसत आहे. एक ताजं उदाहरण म्हणजे एका महिन्यात पुण्यात पाच खुन झाले असे असतांनादेखील मुख्यमंत्री गृहमंत्रीपद देखील स्वतःकडे ठेवून राज्यात गृहखात्याला कसल्याही प्रकारचे कठोर कारवाई करण्याचे आदेश न देता गुन्हेगारांना मोकाट सोडल्याची भूमिका बजावत आहेत असे राज्यातील जनतेने समजावे का ? असा सवाल ड शंकर चव्हाण यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील गुंडगिरी करणाऱ्यांना कसल्याही प्रकारची वचक राहिलेली नाही.

महाराष्ट्रातील बीड जिल्हा गुन्हेगारीच्या बाबतीमध्ये अतिसंवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जातो त्यात परळी तालुका हा त्यापेक्षाही अतिसंवेदननशील म्हणून ओळखला जाते. मस्साजोग प्रकरणात तर सरपंचाचा खूण झाला अशा प्रकारच्या कितीतरी घटना बीड जिल्हयात दिवसें दिवस घडत आहेत. यावर विद्यमान पोलीस अधीक्षक जाऊ द्या आपल्याला काय

पान २ वर...

# गेवराईत विविध कार्यक्रमाचे आयोजन

## उपक्रम:बाळराजे पवारांच्या वाढदिवसा निमित्त



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदार संघातील लोकनेते बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर, रुग्णालयात रुग्णाना फळे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप, गरजु लोकांना बिलॅकट,रक्तदान शिबीर आयोजन करुन बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे

स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक गोरगरीबांचा आधार मा.बाळराजे दादा पवार यांचा दि.२१ डिसेंबर रोजी गेवराई मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रमांने वाढदिवसा निमित्त शहरात रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, शालेय साहित्यांचे वाटप, अशा विविध

पान २ वर...

# परभणी पोलिसांच्या कस्टडीत मृत्यू

## दुःखद:शहीद सोमनाथ सूर्यवंशी यास अभिवादन




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी येथे भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड केल्यानंतर रस्त्यावर उतरलेल्या आंदोलनकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली होती . यातील सोमनाथ सूर्यवंशी याचा परभणी पोलिसांच्या कस्टडीत अमानुषपणे केलेल्या मारहाणीमुळे मृत्यू झाला होता. शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यास परळी येथे भिमवाडी मित्र मंडळाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. व परभणी पोलिसावर कारवाईची मागणी करण्यात आली.

दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी हा युवक एल एल बी. च्या अंतिम वर्षात शिकत होता. परभणी येथे जातीवादी प्रवृत्तीच्या व्यक्तीने भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड केल्यानंतर आंबेडकर प्रेमींच्या वतीने परभणी शहरात तीव्र आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात सहभागी झाला म्हणून सोमनाथ व्यंकटी सूर्यवंशीला परभणी पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्याचा परभणी पोलिसांच्या कस्टडीत पोलिसांनी केलेल्या मारहाणीत मृत्यू झाला आहे. या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. तसेच परभणी

पान २ वर...

# आंबेवेस येथे आनंदोत्सव साजरा

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

गावभागातील अंबेवेस या ठिकाणी आतिश बाजी करून कार्यकर्ते व व्यापारी यांना पेढे देऊन आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी भारतीय जनता पार्टी परळी शहराचे उपाध्यक्ष महादेव इटके मुद्रा लोन समिती सदस्य सुशील हरंगुळे विकास प्रतिष्ठान सहसचिव विकास हालगे बूथ प्रमुख रमेश नागनाथ चौडे नरेश पिंपळे महेश जुनाळ अभिजीत टेकाळे बाळू काका नागापुरे गिरीश धर्माधिकारी बाळू आरविकर नितीन हालगे ज्ञानेश्वर सुरवसे संजय बोर्डे बसलीग बायले सुहास कन्व नितीन देशपांडे अभय लोणीकर हनुमंत गीते सदाशिव राजनाळे आधी सर यावेळी नागरिक उपस्थित होते.



# वाल्मीक कराडांच्या समर्थनार्थ रास्तारोको

## माऊली खाडे :खोटे गुन्हे परत घ्या



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाल्मीक कराड यांच्या वर दाखल झालेले खोटे गुन्हे वापस घ्या व मयत संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर अटक करून देशमुख कुटुंबाला न्याय देण्याच्या मागणीसाठी बीडच्या धारूर तालुक्यातील बीड परळी महामार्गावरील चाटगाव-संगम चौकात रास्ता रोको आंदोलन रविवारी सकाळी दहा ते साडे अकरा वाजेपर्यंत करण्यात आले. जवळपास ३०० ते ४०० ओबीसी समाजासह विविध जाती धर्माचे लोक या रास्ता रोको आंदोलनात होते .

जनसेवक वाल्मीक कराड यांना राजकीय द्वेषापोटी काही राजकीय मंडळींनी खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचे षडयंत्र रचले आहे.याच्या निषेधार्थ चाटगांव संगम देवदहिफळ कांदेवाडी खाडेवाडी येथील नागरिकांनी बीड परळी महामार्गावरील चाटगांव-संगम फाट्यावर रास्तारोको चे आंदोलन केले.दिड तास चाललेल्या या आंदोलनात शेकडो नागरिक सहभागी झाले होते.वाल्मिक कराड हे सर्व जाती धर्माच्या नागरिकांना समान न्याय देतात, अडिअडचणीला धाऊन जातात, बीड जिल्ह्यातील जनतेसाठी राबराबणार्या वाल्मीक कराड यांच्या विरोधात दाखल खोटे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा पुढील काही दिवसांत मोठे आंदोलन करण्यात येणार असून कायदा व

पान २ वर...

## हिरमोड — आ.नमिता लोखंडेंना मंत्रिपदाचे स्वप्नच पडत राहीले

# पुण्यभूमीची बातमी खरी ठरली!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार नमीता लोखंडे यांना मंत्रिपदाचे स्वप्न पडु लागल्याचे दिसून येते आहे. आमदार लोखंडे यांना साधा मतदार संघात मुरकुलचा कारखाना तीस वर्षांत उभा करु शकल्या नाहीत व विधानसभा निवडणुकीत अगदी थोड्याच मतांनी विजयी झाल्या आहेत ते पन टक्केवारीच्या काळ्या धनाच्या जिवावर व आता त्यांना येड उठल आणी जावायाला भेटल या मराठी म्हणीप्रमाणे आमदारा नमीता लोखंडे यांना मंत्रिपदाचे स्वप्न पडले आहे आमदारा नमीता लोखंडे यांनी मतदार संघात येणाऱ्या काळात निवडणूकीत जेवढ आश्वासन जनतेला दीले आहेत तेवढीच पुर्ण करुन दाखवावी, जसे की एमआयडीसी खेड्यापाड्यातील रस्ते, नाल्या असे अनेक आश्वासन दिले आहेत तेवढीच पुर्ण करावी उग उंटावर बसून शेळ्या हाकलण्यासारख मंत्रीपदाची स्वप्न बाळगू नयेत जसे की लग्न झाल्यानंतर हानीमुनला जातात तस मुंबईला निवडणूक झाली की जायचे नंतर मतदार संघात काय चाललंय यांच्याशी काही देने घेने नाही असे आमदारा नमीता लोखंडे घांनी वागू नये कारण लाखो लोकांचे प्रतिनिधित्य करणारा आमदारा असतो असे चर्चा सत्र केज अंबाजोगाई मतदार संघात सुरू झाले आहे अशी बातमी दैनिक पुण्यभूमी दैनिकाने प्रसिद्ध केली होती व ती खरी ठरली आहे कारण आमदारा नमीता लोखंडे यांचे मंत्रीपदाचे स्वप्न ते स्वप्नच राहिले आहे.


Page 6
30 Nov 2024

पुण्यभूमी

नमिता लोखंडेंना पडू लागले स्वप्न?

बोंबला: कामाचा नाही पत्ता अन् मंत्रीपद हवे

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई मतदार संघाच्या नवनिर्वाचित आमदार नमीता लोखंडे यांना मंत्रिपदाचे स्वप्न पडु लागल्याचे दिसून येते आहे.आमदार लोखंडे यांना साधा मतदार संघात मुरकुलचा कारखाना तीस वर्षांत उभा करु शकल्या नाहीत व विधानसभा [illegible]

येणाऱ्या काळात निवडणूकीत जेवढ आश्वासन जनतेला दीले आहेत तेवढीच पुर्ण करुन दाखवावी,जसे की एमआयडीसी खेड्यापाड्यातील रस्ते,नाल्या असे अनेक आश्वासन दिले आहेत तेवढीच पुर्ण करावी उग उंटावर बसून शेळ्या हाकलण्यासारख मंत्रीपदाची स्वप्न बाळगू नयेत जसे [illegible]



# किरण बोराडेने पटकावले सुवर्ण पदक !

## क्रीडा:अक्षय गोटेगावकरांनी केले अभिनंदन




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील गोटेगाव चे भैय्यासाहेब बोराडे पाटील यांचे चिरंजीव किरण मदन बोराडे या विद्यार्थ्याने तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे, शॉट पुट या खेळ प्रकारात एम आय टी ची सरस्वती स्कूल आयोजित शॉट पुट स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त झाले असून किरण चे गोटेगावसह तालुक्यात कौतुक होत आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे अक्षय गोटेगावकर यांनी किरण चे अभिनंदन केले व किरण ने गावा तालुक्यातील मुलांना आदर्श घालून दिला आहे असे सांगीतले. शॉट पुट हा ट्रॅक आणि फील्ड इव्हेंट आहे, ज्यात जड गोलाकार बॉल टाकला जातो. या खेळात, शॉट म्हणजे जड गोलाकार बॉल, जो खांद्यावरून फेकला जातो किंवा ठेवला जातो. या खेळातील उद्देश शक्य तितके जास्त अंतर साध्य करणे हा असतो. शॉट पुट बद्दलची काही माहिती शॉट पुट हा खेळ दगड टाकण्याच्या प्राचीन खेळातून आला आहे. पुरुषांसाठी शॉट पुट हा खेळ १८९६पासून आधुनिक ऑलिम्पिक चा भाग आहे.